रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ७३
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## एशियन गेम्समध्ये भारतीय महिला धावपटूंची 'सुवर्ण'धाव

**नागोया (जपान) :** आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने महिलांच्या ४x४०० मीटर रिलेमध्ये ३ मिनिटे २९.६९ सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले. यंदाच्या या स्पर्धेतील ॲथलेटिक्समधील भारताचे हे पहिले सुवर्णपदक आहे. अखेरचे १५० मीटर अंतर बाकी असताना विथ्या रामराजने कमालीचा वेग पकडत भारतीय संघाच्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. तिच्याशिवाय भारतीय संघात किरण, माचेट्टिरा पूवम्मा आणि प्राची यांचा समावेश होता. चालू आशियाई खेळ स्पर्धेतील भारताचे हे एकूण सहावे सुवर्णपदक ठरले आहे. याआधी भारताची स्टार नेमबाज नीरू धांडा हिने शानदार कामगिरी करत महिलांच्या वैयक्तिक ट्रॅप शूटिंग प्रकारात सुवर्णपदक जिंकले आहे. विशेष म्हणजे या वैयक्तिक ऐतिहासिक कामगिरीपूर्वी नीरूने याच स्पर्धेत महिला ट्रॅप संघासह रौप्यपदक पटकाविले होते.

### अंतरंग

रायगडात साखरचौथींच्या गणपतींची प्रतिष्ठापना/२
मुंबई-रेवस जलवाहतूक गुरुवारपासून पूर्ववत/६
आशियाई क्रीडा स्पर्धेत नीरू धांडाचा 'सुवर्ण'वेध/८

# अग्निवीरांना थेट सरकारी नोकरी

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२९) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध १० निर्णय घेण्यात आले. यामध्ये राज्यातील अग्निवीरांना आता थेट पोलीस दलात आणि इतर तत्सम पदांवर सामावून घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात जे अग्निवीर शासकीय सेवा करू इच्छितात, त्यांच्यासाठी नोकरीचा मार्ग खुला झाला आहे.

सैन्य दलात चार वर्षांची सेवा पूर्ण करून बाहेर पडलेल्या अग्निवीरांना राज्य सरकारी सेवेत सामावून घेण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. गट-क मधील गणवेशधारी सेवांच्या पदांवर माजी अग्निवीरांना १० टक्के समांतर आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अग्निवीरांना राज्यातील संबंधित शासकीय सेवांमध्ये संधी मिळणार आहे.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीसांनी याबाबत माहिती दिली. ते म्हणाले की, अग्निवीरांची पहिली तुकडी त्यांचा कार्यकाळ संपवून परत येणार आहे. त्यातील अग्निवीरांना पोलीस आणि इतर तत्सम पदांवर सामावून घेणार आहोत. त्यांना परीक्षा, प्रशिक्षणाची अट असणार नाही. त्यांना वयातही सूट दिली जाणार आहे. अग्निशमन दलातही त्यांना घेणार आहोत. जेवढे अग्निवीर शासनात येऊ इच्छितात, त्यांना सामावून घेणार आहोत. नौदलातून जे अग्निवीर येतील त्यांना कोस्टल सुरक्षेत सामावून घेतले जाईल. विशेष बाब म्हणून पदांच्या संख्येची शिथिलता करून जेवढे अग्निवीर येतील त्यांना कोस्टल सुरक्षा सेवेत घेतले जाईल.

राज्यातील पशुधनासाठी वर्षभर पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये जिल्हानिहाय चारा उत्पादन, लागवडीयोग्य गवतांच्या जाती, वैरणीसाठी उपयुक्त वृक्ष, सुधारित चारा पिके तसेच पारंपरिक आणि अपारंपरिक



चारा स्रोतांचा विचार करण्यात येणार आहे. या धोरणाद्वारे दुग्ध व्यवसाय आणि पशुपालनाला चालना देण्याचे उद्दिष्ट आहे.

न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून त्यामध्ये २,७६१ पदांचा समावेश आहे तसेच महाराष्ट्र कारागृहे सुधारसेवा अधिनियम २०२५मध्ये सुधारणा करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींच्या फेरवाटपाला मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय इतर काही निर्णयांना मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

### तांत्रिक अडचणीमुळे शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाहीत -मुख्यमंत्री

मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. ते म्हणाले, दुष्काळासंदर्भात आज मंत्रिमंडळामध्ये अनेक मंत्र्यांनी काही त्या त्या विभागातील तालुके हे पीक करपले तरी ट्रिगर वनच्या निकषात बसलेले नाहीत, त्यांनाही मदत करण्याची मागणी केली. यासंदर्भात मंत्रिमंडळाने असा निर्णय केला आहे की, त्या त्या तालुक्यांमध्ये ग्राउंड पाहणी जास्त प्रमाणात करायची आणि त्या माध्यमातून पिकाची करपलेली अवस्था पाहून त्यांना दुष्काळाचे सगळे फायदे द्यायचे. उपसमितीने याबाबत तालुक्यातील परिस्थिती जाणून घ्यावी. तांत्रिक अडचणीमुळे ते मदतीपासून वंचित राहू नये म्हणून विशेष बाब म्हणून याला आपण मान्यता दिली आहे.

# रोजगार महाकुंभला पनवेलमध्ये तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभचा शुभारंभ मंगळवारी (दि.२९) झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या रोजगार मेळाव्यांना पनवेलमध्येही तरुण-तरुणींचा प्रतिसाद लाभला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतामंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत या राज्यव्यापी उपक्रमाचा मुंबईत शुभारंभ झाला.

पनवेलमध्ये अंजुमन-ए-इस्लाम संस्थेच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पस व अब्दुल रज्जाक काळसेकर पॉलिटेक्निक येथेही रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या ठिकाणी



आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. झहीर आय. काझी अध्यक्षस्थानी होते, तर सिनेट सदस्य मयुरेश नेतकर, मोहसिन वास्ता, श्रीकांत कोकाटे, संस्थेचे चेअरमन बुर्हान हॅरिस यांची प्रमुख उपस्थिती होती.

या रोजगार महाकुंभासाठी काळसेकर कॅम्पसमध्ये २,२४८ उमेदवारांनी नोंदणी केली होती, तर १,४०२ उमेदवार मुलाखतीस उपस्थित राहिले. नोंदणीकृत ७५ कंपन्यांपैकी ६४ कंपन्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. कॅस्ट्रॉल, हिंदुस्तान प्लॅटिनम, एशियन पेंट्स, अदानी एनर्जी, फोर्स मोटर्स, अल्केम, झेनो हेल्थ आदी नामांकित कंपन्यांनी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या तसेच २० सामंजस्य करार केले. विविध विभागांच्या समन्वयातून हा रोजगार महाकुंभ तरुणाई आणि उद्योगविश्व यांना जोडणारे प्रभावी व्यासपीठ ठरला.

# पनवेल महापालिका स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवारी (दि.२९) मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजुरी देण्यात आली.

या सभेस स्थायी समिती सदस्य, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महेशकुमार मेघमाळे, सचिव नानासाहेब कामठे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, स्वरूप खारगे, मुख्य लेखाधिकारी पूनम पाटील, शहर अभियंता राजेश कर्डिले, उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते.

यावेळी महापालिका क्षेत्रातील रस्त्यांवर व मनपा मालकीच्या मोकळ्या भूखंडावर वार्षिक तत्त्वावर माहिती दर्शक फलक बसवणे (दोन वर्षांकरिता) या कामाच्या सकारात्मक वा नकारात्मकला मान्यता मिळण्याबाबतच्या विषयाला स्थायी समितीने मंजुरी दिली.

प्रभाग समिती ब, कळंबोली धारण तलाव येथे पंपिंग स्टेशन बांधणे



व इतर अनुषंगिक उपाययोजना करण्याबाबतच्या विषयाला मंजुरी देण्यात आली. खारघर-कोपरा प्लॉट २५, से.१५ येथील भूखंडाला संरक्षण भिंत बांधणे तसेच विरंगुळा केंद्र इमारतीवर शेड उभारणे व त्या अनुषंगाने इतर कामे करण्यास समितीने मान्यता दिली.

महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी दोन वर्षांकरिता विद्युत उपकरणे व व्यवस्था भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे या कामांतर्गत अंतिम देयक अदा करण्याकरिता झालेल्या खर्चास मान्यता मिळण्याबाबतच्या विषयाला स्थायी समितीने मंजुरी दिली.

महापालिकेमार्फत साजरे करण्यात येणारे सण, जयंती, उत्सव तसेच विविध कार्यक्रमांनिमित्त इमारती, रस्ते, चौक व स्मारक या ठिकाणी तीन वर्षे कालावधीकरिता भाडेतत्त्वावर आकर्षित विद्युत रोषणाई उपलब्ध करून देणे या कामाच्या न्यूनतम निविदेस मान्यता मिळण्याबाबतच्या विषयाला स्थायी समितीने मंजुरी दिली. **(पान २ वर..)**

## निवडक

### सचिन वाझेला जामीन, पण कोर्टाने घातल्या अटी

**मुंबई :** ॲंटिलिया स्फोटके आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) अटक केलेला प्रमुख आरोपी माजी पोलीस अधिकारी सचिन वाझे याला सत्र न्यायालयाच्या विशेष न्यायालयाने मंगळवारी (दि.२९) एक लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तितक्याच रकमेच्या स्थानिक जामिनावर सुटकेचे आदेश दिले, मात्र कोर्टाने वाझेला जामीन मंजूर करताना पाच जिल्ह्यांच्या प्रवेशबंदीसह अटी व शर्ती घातल्या आहेत.

### वादळी वाऱ्यासह परतीच्या पावसाची जोरदार हजेरी

**अलिबाग :** वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह परतीच्या पावसाने मंगळवारी (दि.२९) रायगड जिल्ह्यात हजेरी लावली. त्यामुळे काही ठिकाणी विद्युत पोल वाकले असून झाडांच्या फांद्या तुटल्या, तर काही ठिकाणी झाडे पडून नुकसान झाले आहे. दरम्यान, पावसाने ओढे, नाले वाहू लागले.

# सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे मंगळवारी पनवेलमध्ये पारितोषिक वितरण

## सोहळ्यास मान्यवरांची लाभणार उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २५व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा मंगळवारी ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

यावेळी राज्याचे माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिकमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या दिवाळी अंकांना पारितोषिके प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध साहित्यिक विश्वास पाटील, प्रसिद्ध चरित्रलेखिका वीणा गवाणकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

दिवाळी अंकांच्या परंपरेला प्रोत्साहित करणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्यांना लाखो रुपयांची पारितोषिके देऊन त्यांच्या सर्जनशीलतेचा सन्मान केला जात असून या सोहळ्याला साहित्यप्रेमी, लेखक, पत्रकार, संपादक आणि दिवाळी अंक रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे यांनी केले आहे.

# 'रयत'मुळे जीवनाला दिशा -लोकनेते रामशेठ ठाकूर

## महात्मा फुले महाविद्यालयात कर्मवीर जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

"रयत शिक्षण संस्थेमुळे माझ्या जीवनाला दिशा मिळाली, तर कर्मवीर अण्णा आणि रयत माऊलीमुळे माझे जीवन 'रयतमय' झाले. या संस्थेचे ऋण कधीही फेडता येणार नाही. संस्थेप्रति कृतज्ञ राहणे हे माझे कर्तव्य आहे," असे उद्गार संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी काढले.

पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९वी जयंती मंगळवारी (दि.२९) उत्साहात साजरी करण्यात आली. या समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवव्याख्याते व प्रसिद्ध लेखक प्रशांत देशमुख उपस्थित होते तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, वाय.टी. देशमुख,



लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील उपस्थित होते.

अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांना संबोधित करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेशी असलेले आपले ऋणानुबंध उलगडून दाखवले. "मी याच संस्थेत शिकलो आणि संस्थेने मला खूप काही दिले," अशी कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शिवव्याख्याते व प्रसिद्ध लेखक प्रशांत देशमुख यांनी 'समग्र कर्मवीर पर्व' उलगडताना पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजासाठी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा प्रभावी शब्दांत वेध घेतला. कर्मवीर भाऊराव म्हणजे दुसरे रवींद्रनाथ, असे गौरवोद्गार काढत त्यांनी कर्मवीर अण्णांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी प्रास्ताविक करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जपान येथे आयोजित २०व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत १० मीटर एअर रायफल या क्रीडाप्रकारात सांघिक रौप्यपदक मिळविणाऱ्या पार्थ राकेश माने याचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एक लाख, महेंद्र घरत यांनी ५० हजार, तर करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार यांनी १० हजार रुपयांचे बक्षीस दिले. संगीत अलंकार स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या स्नेहल सुनील पाटील हिला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २५ हजार रुपयांचे बक्षीस देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मण गवळी, डॉ. सोपान गोवे, डॉ. सोनू लांडे, माजी उपप्राचार्य डॉ.आर.ए. पाटील, डॉ.रमेश म्हात्रे, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.




# तरुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

देशाच्या युवा शक्तीला रोजगारक्षम बनविण्यासाठी शिक्षणासोबत कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि रोजगार यांची सांगड घालणे आवश्यक आहे. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून बदलत्या तंत्रज्ञानानुसार (एआय, सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग) सातत्याने 'अपस्किलिंग' आणि कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. जगात २८ हून अधिक देशांमध्ये मनुष्यबळाची मोठी मागणी असून, महाराष्ट्रातील तरुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे." असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने 'पंडित दीनदयाल उपाध्याय महारोजगार मेळाव्याचा आज कोकण व नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यात' ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च व



तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो. हेमलता बागला, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयुक्त डॉ. अमित सैनी, मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल, व्यवसाय व शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सुर्यवंशी, सृजन ट्रस्टचे अध्यक्ष दिपक मुकादम यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राज्यभरातून ऑनलाईन व प्रत्यक्ष प्रणालीद्वारे हजारो विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ संदेशाव्दारे रोजगार मेळाव्याला शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री यांच्या हस्ते सहीदा परमाणिक यांना क्रेवा कॅपीटल सर्व्हिसेस प्रायवेट लिमीटेड बेलापूर व कांती शंभू चव्हाण यांना क्रेवा कॅपीटल सर्व्हिसेस प्रायवेट लिमीटेड, कुर्ला येथील या कपंनीकडून नियुक्तीपत्र देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्याच्या माध्यमातून कोकण व नाशिक विभागातील तरुणांना जास्तीत जास्त रोजगार आणि स्वरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अशी आशा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतील विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार ही त्रिसूत्री अत्यंत महत्वाची आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला 'अंत्योदय' आणि 'एकात्म मानव दर्शन' हा विचार समाजातील शेवटच्या घटकाचा विकास साधणारा आहे.याच विचारावर आधारित शासनाचे कामकाज सुरू आहे."

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशामध्ये शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार मानव संसाधनाची निर्मिती हा सगळ्यात महत्वाचा विषय आहे, ज्याच्या आधारावर २०४७चा विकसित भारत आपण तयार करू शकणार आहोत. गरीबी मुक्त, बेरोजगारी मुक्त, रोगमुक्त भारत हे जे आपलं स्वप्न आहे. या स्वप्नाकडे जाण्याकरता खऱ्या अर्थानं शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार या त्रिसूत्रीच्या आधारावर आपल्याला ही व्यवस्था उभी करायची आहे. आज देशातील ६५ टक्के लोकसंख्या ही कार्यक्षम युवाशक्ती आहे. एकीकडे उद्योजकांना कुशल मनुष्यबळाची गरज आहे, तर दुसरीकडे तरुणांना रोजगाराची आवश्यकता आहे. या दोघांना जोडणारा भक्कम दुवा म्हणून हे रोजगार मेळावे काम करत आहेत. बदलत्या तंत्रज्ञानानुसार युवकांनी सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. युवकांना रोजगार देणारे आणि रोजगार शोधणारे यांच्यातील दुवा म्हणून रोजगार मेळावे महत्वाची भूमिका बजावतात.

कोकण व नाशिक विभागातील १२ जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले आहेत.आतापर्यंत १५०० पेक्षा अधिक उद्योजक नियोयांनी आणि एक लाखांपेक्षा अधिक रोजगार इच्छुक युवक-युवतींनी रोजगार महाकुंभासाठी नोंदणी केली आहे. सहभागी उद्योजकांकडून २५,००० पेक्षा अधिक रोजगाराच्या संधी रिक्त पदांची मागणी नोंदविण्यात आली आहे.जिल्हानिहाय शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, स्थानिक प्रशासन व इतर संस्थांच्या समन्वयातून उमेदवार व नियोयांचे समन्वय करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कामगार विभाग, उद्योग विभाग, पणन विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, विद्यापीठे आणि औद्योगिक संघटना यांचे सहकार्य लाभले.

## मुसळधार पावसाने नागोठण्यात साचले पाणी

### हवेत गारवा, शेतकऱ्यांना दिलासा



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहर व परिसरात मंगळवार दि. २९ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास जवळजवळ एक तास मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावल्याने नागोठणे जलमय झाले. अचानक आलेल्या या पावसामुळे गेल्या कित्येक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकरी वर्गासह नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सप्टेंबर महिन्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने शेतकरी वर्ग चिंतेत होता. तसेच पुढील काळात पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्येही काळजीचे वातावरण होते. मात्र, आज झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून हवेत प्रचंड उष्णता जाणवत असल्याने नागरिक त्रस्त झाले होते. त्यातच सायंकाळी सुमारे एक तास झालेल्या मुसळधार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, उकाड्यापासून नागरिकांची सुटका झाली आहे.

पावसामुळे शहरातील रस्ते व सखल भागात पाणी साचले असले तरी, पावसाच्या आगमनामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. अचानक बरसलेल्या या पावसाने शेतकरी, व्यापारी, महिला, युवक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले असून नागोठणे परिसरात उत्साही वातावरण निर्माण झाले आहे.

## मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाची सुरक्षित पिण्याच्या पाण्यासाठी कृती योजना

**रोहा : प्रतिनिधी**

पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता आणि गैर-उपनगरीय रेल्वे स्थानकांवरील स्वच्छता व प्रवासी सुविधांबाबतच्या 'सीएजी' अहवालाच्या अनुषंगाने आणि रेल्वे बोर्डाच्या निर्देशांचे पालन करत मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने सुरक्षित पिण्याचे पाणी सुनिश्चित करण्यासाठी सर्व स्थानके, वसाहती आणि कामाच्या ठिकाणी युद्धपातळीवर विशेष मोहीम हाती घेतली आहे.

मध्य रेल्वेने मुंबई विभागातील सर्व स्थानके, वसाहती आणि कामाच्या ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या यंत्रणांची तपासणी केली आणि त्यांना एकासमान चाचणी आणि देखभाल वेळापत्रकाखाली आणले. यामध्ये मुंबई विभागातील एकूण २९१३ पाण्याच्या टाक्यांपैकी २४७९ टाक्यांची (८५% पेक्षा जास्त) स्वच्छता करण्यात आली. यामध्ये प्लॅटफॉर्म, स्थानक परिसर, कार्यालयीन परिसर आणि रेल्वे वसाहतींमधील पाण्याच्या टाक्यांचा समावेश होता.

उर्वरित ४३४ टाक्यांच्या स्वच्छतेचे काम सध्या सुरू आहे. ४१० टाक्यांमध्ये त्रुटी आढळून आल्या होत्या, त्यापैकी ४०९ त्रुटींचे निवारण करण्यात आले आहे. उर्वरित एका टाकीच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे.सर्व १७१६ ठिकाणी पाण्याच्या टाक्यांना घट्ट झाकणे आणि व्हेंट्स/ओव्हरफ्लोवर जाळ्या बसवण्याची कार्यवाही १००% पूर्ण करण्यात आली आहे.२६ गळती किंवा दोषपूर्ण पाईपलाईन्सच्या दुरुस्तीचे काम १००% पूर्ण करण्यात आले आहे. दूषितपणा आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासण्यात आलेले २९ हँड पंप/बोअरवेल स्रोत १००% योग्य असल्याचे आढळले आहे. दैनंदिन ' क्लोरीन फ्री रेसिड्यूअल ' देखरेखीखाली १३४ ठिकाणांचा समावेश करण्यात आला आहे.सध्याच्या मोहिमेदरम्यान तपासण्यात आलेले सर्व ३४९ नमुने जिवाणूजन्य दूषिततेबाबत 'निगेटिव्ह' (सुरक्षित) आढळले आणि कोणत्याही ठिकाणी 'ई-कोलाय' आढळले नाही. प्रवाशांना सध्या पुरवले जाणारे पिण्याचे पाणी सुरक्षित आणि पिण्यायोग्य आहे.मध्य रेल्वे सुरक्षित, स्वच्छ आणि पिण्यायोग्य पाणी पुरवण्यासाठी तसेच सर्व स्थानकांवर पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेचे पालन करण्यासाठी कटिबद्ध आहे.

## नेरळ-कर्जत परिसरातील दुचाकीचोरांची टोळी पोलिसांच्या जाळ्यात!

**कर्जत , नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ आणि कर्जत परिसरात मोटारसायकल चोरीच्या घटनांचा तपास करताना नेरळ पोलिसांनी चोरीप्रकरणातील संशयितांचा माग काढत एका १८ वर्षीय आरोपीला अटक केली आहे. त्याच्यासोबत असलेल्या दोन विधीसंघर्ष ग्रस्त बालकांना ताब्यात घेऊन त्यांच्याबाबत कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी या कारवाईत नेरळ आणि कर्जत हद्दीतून चोरी झालेल्या दोन स्कुटी, असा एकूण सुमारे ६५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.




नेरळ पोलीस ठाण्यात डिकसळ - नेरळ येथील रोहित ढाब्यासमोरून टीव्हीएस कंपनीची एन्टॉर्क-१२५ स्कुटी चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली होती. रस्त्याच्या बाजूला उभी केलेली ही स्कुटी अज्ञात व्यक्तींनी लबाडीच्या उद्देशाने चोरी करून नेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना नेरळ पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संशयितांचा माग काढला. तपासा दरम्यान इलिया फ्रान्सीस मिरांडा वय १८, रा. बुवापाडा, अंबरनाथ याचा सहभाग निष्पन्न झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, संशयित वारंवार वास्तव्याचे ठिकाण बदलत असल्याने गोपनीय माहितीच्या आधारे त्याला अंबरनाथ येथून ताब्यात घेण्यात आले.

चौकशी दरम्यान त्याने दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांसोबत मिळून नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी प्रसिद्ध सांगितले. त्यानंतर आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असून, त्याला पोलीस कोठडी घेण्यात आली आहे. आरोपी कडून आणखी एका दुचाकी चोरीच्या गुन्ह्याची माहिती समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. आल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

## सिडकोच्या 'नवी मुंबईत स्वतःच्या नावे घर नसावे' या अटीत शिथिलता

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोतर्फे प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या बिगर-PMAYप्रकल्पांतील सदनिकांसाठी 'नवी मुंबईत स्वतःच्या नावे घर नसावे' या पात्रता अटीत शिथिलता देण्यात आली आहे. या निर्णयाचा लाभ गृहनिर्माण प्रकल्पांत सदनिका घेऊ इच्छिणाऱ्यानागरिकांना होणार आहे

जून २०२६ मध्ये सुरू करण्यात आलेल्या FCFS योजनेअंतर्गत काही सदनिका अद्याप उपलब्ध आहेत.अर्जदाराच्या स्वतःच्या किंवा कुटुंबातील सदस्याच्या नावावर नवी मुंबईत सदनिका असली तरी, त्यापैकी कोणत्याही व्यक्तीने यापूर्वी सिडकोच्या कोणत्याही गृहनिर्माण योजनेअंतर्गत सदनिका घेतलेली नसल्यास,सदनिका बुक करता येईल.

उपलब्धतेनुसार अर्जदारांना त्यांच्या पसंतीची सदनिका थेट निवडून बुक करता येणार. सर्व देय रक्कम प्राप्त झाल्यानंतर व आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सदनिकेचा तत्काळ ताबा देण्यात येणार.या संधीचा लाभ घेऊन उपलब्ध सदनिका बुक करण्याचे आवाहन सिडकोतर्फे इच्छुक नागरिकांना करण्यातआले आहे.

**गृहनिर्माण योजनांची ठिकाणे**

अ. क्र. नोड व सेक्टर

१ स्वप्नपूर्ती CHS, खारघर

२ KH-३ वास्तुविहार-सेलिब्रेशन, खारघर

३ NRI कॉम्प्लेक्स, सीवूड्स.

## सीकेटीच्या विद्यार्थ्यांची मॉंनटेरिया व्हिलेजला शैक्षणिक क्षेत्रभेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर विद्यालय, इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक क्षेत्रभेटीचे आयोजन २८ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. या सहलीत एकूण ६३० विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले होते. खालापूर येथील मॉंनटेरिया व्हिलेज येथे आयोजित या शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांना भारतातील पहिले शाश्वत, पर्यावरणपूरक व्हिलेज रिट्रीट पाहायला मिळाले.

मुंबई आणि पुणेदरम्यान कर्जतजवळ स्थित हे थीम पार्क आणि इको रिसॉर्ट आहे. या क्षेत्रभेटीत विद्यार्थ्यांनी विविध अनुभवांचा आनंद घेतला. गावसंस्कृती अंतर्गत पर्यटकांना जुन्या आणि पारंपरिक ग्रामीण जीवनाचा अनुभव या ठिकाणी घेता येतो. हे मानवनिर्मित गाव सुमारे ३६ एकर परिसरात पसरलेले आहे. येथे मातीची भांडी बनवणे, बैलगाडी किंवा ट्रॅक्टर राइड, पारंपरिक खेळ आणि लोकसंगीत यांसारख्या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच रेन डान्स आणि जलतरण तलावाचाही आनंद लुटला.

## रायगडात साखरचौथीच्या गणपतींची प्रतिष्ठापना

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात साखरचौथीच्या गणेशोत्सवाला मंगळवारी (दि. २९) उत्साहात सुरुवात झाली. जिल्ह्यात ४२४ सार्वजनिक तर ६७० खाजगी गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली.गणेशोत्सवाची सांगता झाल्यानंतर येणाऱ्या पहिल्या संकष्टी चतुर्थीला साखरचौथीचा गणेशोत्सव साजरा करण्याची परंपरा आहे. या गणेशोत्सवाला 'गौरा गणपती' असेही संबोधले जाते.

मंगळवारी सकाळपासूनच जिल्ह्यातील विविध भागांत गणेश आगमनाच्या मिरवणुका काढण्यात आल्या. अनेक ठिकाणी गणरायांच्या मूर्तींचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात आणि गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात गणरायांचे आगमन झाले. त्यानंतर विधिवत प्राणप्रतिष्ठा करून पूजा-अर्चा करण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यात सर्वत्र भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. बुधवारी गौरा गणपतींचे विसर्जन होईल.

अलिबाग येथील ठिकरुळ नाका मित्रमंडळाच्या गणेशमूर्तीचा आगमन सोहळाही वैशिष्ट्यपूर्ण ठरला. मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक उत्सवासोबतच सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला होता. गणेश आगमन मिरवणुकीत मंडळाने पोलीस सुरक्षा रथ सजवला होता.या रथावर वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत विविध संदेश देण्यात आले होते. वाहन चालविताना वाहतूक नियमांचे पालन करणे, सुरक्षित वाहनचालकाची जबाबदारी पार पाडणे, तसेच नियमांचे उल्लंघन टाळणे याबाबत जनजागृती करण्यात आली. 'वाहतुकीचे नियम पाळा, अपघात टाळा' असा संदेश देत नागरिकांनी वाहतूक शिस्तीचे पालन करावे, असे आवाहन या माध्यमातून करण्यात आले होते.

पान १ वरुन

## पनवेल महापालिका स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

महापालिका क्रिकेट अकॅडमी येथे सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षा यंत्रणा बसविणेबाबतच्या विषयाला स्थायी समितीने मान्यता दिली. महापालिका क्षेत्रात सिडकोने विकसित केलेल्या खारघर नोडमधील मलनिःस्सारण वाहिन्यांची दोन वर्षे कालावधीकरिता आवश्यकतेप्रमाणे दुरूस्ती, सुधारणा व नूतनीकरण करणे या कामाच्या सुधारित प्रशासकीय खर्चास मान्यता मिळण्याबाबतच्या विषयाला मान्यता देण्यात आली.

कामोठे सेक्टर ३२ येथील ८५ एमएलडी क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्राचे सिडकोने नियुक्त केलेले ठेकेदारामार्फत परिचलन, देखभाल व दुरुस्ती पनवेल महानगरपालिकेमार्फत नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत वाढीव मुदतीबाबतच्या विषयाला स्थायी समितीने मान्यता दिली.

महापालिका क्षेत्रात यांत्रिकी पद्धतीने धुरीकरण व फवारणी सेवा पुरविणेबाबतच्या विषयाला स्थायी समितीने मान्यता दिली. दैनंदिन रस्ते-नालेसफाई व इतर अनुषंगिक कामासाठी मनुष्यबळाचा पुरवठा करण्याकामी मुदतवाढ देण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली. महापालिका हद्दीत विशेष सखोल स्वच्छता मोहीम राबविण्याबाबतच्या विषयाला स्थायी समितीने मान्यता दिली. महापालिका क्षेत्रातील (पनवेल शहर वगळता) २९ गावांकरिता तीन वर्षांसाठी पाणीपुरवठा योजनेची दैनंदिन देखभाल व निगा दुरुस्ती करण्याबाबतच्या विषयाला मान्यता देण्यात आली. पनवेल शहरातील पाणीपुरवठा योजनेची निगा व दुरुस्ती तीन वर्षांकरिता (२+१) करण्याबाबतच्या विषयाला स्थायी समितीने मान्यता दिली.

## मध्य रेल्वेवर १ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान तिकीट तपासणी मोहीम

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे १ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत तिकीट तपासणीची एक विशेष मोहीम राबवणार आहे. यामध्ये प्रवाशांच्या तिकिटांची सत्यता आणि वैधता तपासण्यावर विशेष भर दिला जाईल. स्थानकांवर आणि रेल्वे प्रवासादरम्यान तिकिटांची तपासणी करण्यासोबतच, सवलतीच्या दरातील तिकिटे, विशिष्ट आरक्षण कोटा आणि विविध पासद्वारे आरक्षित केलेल्या तिकिटांवर या मोहिमेत विशेष लक्ष केंद्रित केले जाईल.

तिकिटांची, विशेषतः अनारक्षित तिकिटांची सत्यता पडताळण्यावरही लक्ष दिले जाईल.आरक्षण सुविधांचा गैरवापर रोखणे, सवलती आणि पासचा फसवणुकीने होणारा वापर थांबवणे आणि रेल्वेच्या महसुलातील गळती रोखणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.



खोपोली : परतीच्या पावसाने विजांच्या कडकडाटासह सायंकाळी पाचच्या सुमारास हजेरी लावली.

# जागतिक रेबीज दिनानिमित्त पनवेल मनपाची मोफत लसीकरण मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक रेबीज दिनाचे औचित्य साधून महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत महापालिका कार्यक्षेत्रात मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. "स्ट्राँगर टुगेदर" अर्थात एकत्र येऊन अधिक मजबूत या संकल्पनेवर आधारित ही मोहीम २८ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर या कालावधीत राबवली जात आहे. रेबीज या प्राणघातक आजाराचे पूर्णपणे



निर्मूलन करणे आणि सार्वजनिक आरोग्य अधिक बळकट करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

यासाठी फिरत्या दवाखान्यांद्वारे पाळीव तसेच परिसरातील भटक्या श्वानांना मोफत लस दिली जात आहे. लसीकरण शिबिरांचे वेळापत्रक दररोज सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत असे आहे. ३० सप्टेंबर रोजी सिडको ऑफिसच्या बाजूला कामोठे व प्रशांत कॉर्नरजवळ सेक्टर ३५ खारघर येथे शिबिर होईल. १ ऑक्टोबर रोजी महात्मा स्कूलजवळ खांदा कॉलनी व उत्सव चौक खारघर, २ ऑक्टोबर रोजी वडाळे तलाव पनवेल व शिल्प चौक खारघर, तर ३ ऑक्टोबर रोजी पांजरपोळ टपाल नाका पनवेल व फूड वे हॉटेलजवळ सेक्टर २० तळोजा फेज २ येथे लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिक आणि प्राणीप्रेमींनी आपल्या पाळीव श्वानांना तसेच परिसरातील भटक्या श्वानांना या फिरत्या लसीकरण केंद्रांवर आणून मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लस द्यावी आणि पनवेलला रेबीजमुक्त बनवण्याच्या या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी जिद्दीने अभ्यास करावा : लोकनेते रामशेठ ठाकूर

## रिटघर विद्यालयात कर्मवीर जयंती उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी जिद्दीने अभ्यास करावा, विविध स्पर्धांमध्ये हिरिरीने सहभागी व्हावे, आपल्याकडील ज्ञान व साधने इतरांना देऊन मदत करावी तसेच आई-वडील आणि शिक्षकांच्या आज्ञेचे पालन करावे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रिटघर येथे केले तसेच हायस्कूलच्या विकासासाठी आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९वी जयंती आणि गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक आर.बी. कारंडे यांनी प्रास्ताविक केले. यानंतर ५वीची विद्यार्थिनी आराध्या पाटील आणि शिक्षक अमित पाटील यांनी कर्मवीर अण्णांच्या जीवनचरित्रावर अत्यंत प्रभावी भाषणे केली.

चिमुकल्या आराध्या पाटीलच्या उत्कृष्ट वक्तृत्वाने प्रभावित होऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिला ५वी ते ७वीपर्यंत दरवर्षी १० हजार रुपये आणि ८वी ते १०वीपर्यंत दरवर्षी १५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. या सोहळ्यात विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी सुभाषशेठ भोपी तसेच बळीराम भोपी, गोपीनाथशेठ भोपी व वंदनाताई भोपी यांच्या वतीने शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील गुणवंतांना पारितोषिके देण्यात आली. यामध्ये ५वी ते १२वीच्या परीक्षेत प्रथम तीन क्रमांक मिळवणारे विद्यार्थी तसेच जिल्हा, तालुका व विभागीय स्तरावरील कुस्ती स्पर्धेत चमकलेल्या खेळाडूंचा समावेश होता.

यावेळी कोकण विभाग आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त विद्यालयाच्या उपशिक्षिका गावंड मॅडम, कुस्ती प्रशिक्षक विश्वनाथ भोपी आणि विद्यालयाचे क्रीडा प्रमुख अमित पाटील यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, एम.के. कोंगेरे, व्ही.यू. जगताप उपस्थित होते, ज्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याशिवाय जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, अंकुश खैर, सरपंच सुभाष भोपी, सुप्रिया करमेलकर, बाळाराम भोपी, बळीराम भोपी, विष्णू भगत, राजेश भोपी, विलास भोपी, नवनाथ भोपी, वंदना भोपी, प्रल्हाद भोपी, संजय पाटील, दीपक पाटील, राजन भगत, विश्वनाथ भोपी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भारत भोपी, उपाध्यक्ष रमेश पाटील यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हृदयाच्या आरोग्यासाठी खारघरमध्ये वॉकेथॉन

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक हृदय दिनानिमित्त हृदयाच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर यांच्या वतीने ३ किलोमीटर वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. 'डोन्ट मिस अ बीट' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात नागरिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले. नियमित व्यायाम, शारीरिक हालचाल, संतुलित जीवनशैली आणि वेळोवेळी आरोग्य तपासणीचे महत्त्व यावेळी सांगण्यात आले.

हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत करता यावी यासाठी सीपीआरचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व प्रशिक्षणही घेण्यात आले. वॉकेथॉनला अभिनेत्री वर्षा उसगावकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.



तसेच जागतिक मास्टर्स क्लासिक अँड इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियन २०२५ आणि भारतीय हवाई दलाचे माजी अधिकारी दत्तात्रय ए. उतेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र व कर्नाटक विभागाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल आणि नवी मुंबईचे सेंटर हेड संदीप जोशी यावेळी उपस्थित होते. हृदयाच्या आरोग्यासाठी नियमित शारीरिक हालचाल आणि सक्रिय जीवनशैली आवश्यक आहे.

दरम्यान, नागरिकांनी आपल्या आरोग्यासाठी नियमित वेळ देण्याची सवय लावावी, असे नीरज लाल यांनी सांगितले. हृदयविकाराची आपत्कालीन परिस्थिती कोणत्याही वेळी उद्भवू शकते. अशा वेळी सीपीआरचे ज्ञान एखाद्याचा जीव वाचवण्यासाठी महत्त्वाचे ठरू शकते, असे संदीप जोशी यांनी सांगितले. वर्षा उसगावकर यांनी नियमित व्यायाम, योग्य आहार आणि तणावाचे व्यवस्थापन करण्याचे आवाहन केले, तर दत्तात्रय उतेकर यांनी फिटनेससाठी सातत्य आणि शिस्तबद्ध जीवनशैली आवश्यक असल्याचे सांगितले.

# उड्डाणपुलाखालील मोकळ्या जागेत क्रीडांगण उभारण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील उड्डाणपुलांखाली उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागांचा योग्य वापर करून नागरिक आणि मुला-मुलींसाठी क्रीडांगण व व्यायामाची सुविधा विकसित करावी, अशी मागणी प्रभाग क्रमांक १७चे नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ यांनी महापौरांकडे निवेदनाद्वारे केली आहे. पनवेल ते नवीन पनवेलला जोडणाऱ्या उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणात मोकळी जागा असून या ठिकाणी काही बेकायदेशीर व्यवसाय सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या जागेचा नियोजनबद्ध वापर केल्यास परिसरातील मुलांना आणि युवकांना



खेळण्यासाठी सुविधा उपलब्ध होऊ शकते. तसेच अनधिकृत व्यवसायांमुळे उड्डाणपुलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. उड्डाणपुलाखालील जागेवर फुटबॉल, क्रिकेट, बास्केटबॉल, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, स्केटिंग यांसारख्या खेळांसाठी सुविधा उभारण्यासोबतच लहान मुलांसाठी खेळण्याची जागा आणि नागरिकांसाठी व्यायामाची साधने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासाठी संबंधित जागांची पाहणी करून आवश्यक सर्वेक्षण करावे तसेच शक्य असलेल्या ठिकाणी सुरक्षित व सर्वसमावेशक क्रीडांगणे विकसित करावीत. मैदानासाठी योग्य फ्लोअरिंग, प्रकाश व्यवस्था, संरक्षक जाळी, बाके, पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही अॅड. भुजबळ यांनी केली आहे. महापौर कार्यालयात हे निवेदन सादर करण्यात आले असून मागणीचा सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली आहे.

# बनावट चलनाची लिंक उघडली अन् खात्यातून ५.२० लाख गायब

**पनवेल : वार्ताहर**

वाहतूक पोलिसांनी वाहनावर चलन बजावल्याचा बनावट संदेश पाठवून त्यातील लिंक उघडण्यास भाग पाडत ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाच्या मोबाईलमध्ये घुसखोरी करून त्याच्या बँक खात्यातून ५ लाख २० हजार रुपये लंपास केल्याची घटना कळंबोलीत समोर आली आहे. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांचा शोध सुरू आहे.

कासीम कारदअली शेख यांचा तळोजा एमआयडीसीत ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. त्यांच्या मालकीची वाहने पार्किंगमध्ये उभी होती. त्याच दिवशी सकाळी सुमारे सात वाजता त्यांच्या मोबाईलवर वाहतूक पोलिसांनी वाहनावर चलन बजावल्याचा बनावट संदेश आला. या संदेशासोबत एक लिंकही पाठवण्यात आली होती. शेख यांनी लिंक उघडली असता मोबाईल अपडेट करण्यास सांगण्यात आले. लिंक संशयास्पद वाटल्याने त्यांनी कोणतीही माहिती न भरता ती बंद केली. मात्र त्यानंतर काही क्षणांतच मोबाईल गरम होऊन स्वतःहून अपडेट मोडमध्ये गेला.

त्याचवेळी मोबाईलवर एकापाठोपाठ एक ओटीपी संदेश येऊ लागले. संशय बळावल्यानंतर मित्राच्या सल्ल्याने शेख यांनी मोबाईल फॅक्टरी रिसेट केला. त्यानंतर ओटीपी येणे बंद झाले. मात्र गुगल पे आणि फोन पे पुन्हा सुरू करताच पुन्हा ओटीपी संदेश येऊ लागल्याने त्यांनी तातडीने जुने सिमकार्ड बंद करून नवीन सिमकार्ड घेतले.

# पनवेलमधून इसम बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील तक्का येथील मोराज रिव्हरसाइड पार्क येथून सचिन विलास सूर्यगंध हे बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी त्यांच्या पत्नी नमिता सूर्यगंध यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सचिन सूर्यगंध हे बीएमसी, मुंबई येथे कामाला जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले, मात्र त्यानंतर ते घरी परतले नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

त्यांचा शोध घेऊनही ते न सापडल्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात मिसिंग नोंद करण्यात आली. बेपत्ता सचिनचा रंग सावळा, उंची ५ फूट ६ इंच, मध्यम बांधा, गोल चेहरा असून डोक्याचे केस काळे-पांढरे आहेत. त्यांनी निळ्या रंगाचा टी-शर्ट परिधान केला होता.

# 'सीकेटी'चा ओम पाटील जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय पुणे, महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने २४ सप्टेंबर रोजी हार्मोनी स्कूल, खारघर येथे आयोजित जिल्हास्तरीय १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयातील ओम योगेश पाटील (११वी कॉमर्स) याने प्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्याची विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख,



अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ओमचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# गव्हाण विद्यालयाचे धनाजी ठाकूर यांची सेवापूर्ती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथील सेवाभावी शिक्षकेतर कर्मचारी धनाजी ठाकूर अर्थात 'ठाकूर आप्पा' यांच्या सेवापूर्तीनिमित्त विद्यालयात भावपूर्ण सोहळा संपन्न झाला. विद्यालयाच्या वतीने ठाकूर आप्पा व त्यांच्या पत्नी सुरेखा ठाकूर यांचा सपत्नीक सत्कार करून सदिच्छा भेट देण्यात आली.

उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी ठाकूर आप्पांच्या प्रदीर्घ सेवाप्रवासाचा गौरव केला. यावेळी माजी ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षक व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, ग्रंथपाल महेश म्हात्रे, माजी सेवक चंद्रकांत मढवी यांनी त्यांच्या कार्याच्या



आठवणींना उजाळा दिला. माजी प्राचार्या डोईफोडे यांनीही शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्नी सुरेखा ठाकूर, मुलगा निखिल ठाकूर, सून उन्नती ठाकूर, नात वामिका, मुलगी दक्षता ठाकूर, बहिणी यशोदा गावंड, संध्या नाईक, नमिता ठाकूर, भाचा वेदक, भाची दया व इतर कुटुंबीय उपस्थित होते. कन्या दक्षता ठाकूर यांनी वडिलांच्या सेवाभावी कार्याचा गौरव केला.

सत्काराला उत्तर देताना ठाकूर आप्पांनी कर्मवीर अण्णांच्या स्मृतीस अभिवादन करून रयत माऊली, शिक्षक, सेवक, विद्यार्थी आणि सहकाऱ्यांचे आभार मानले. प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी ठाकूर आप्पांच्या सेवेचा गौरव करत निरोगी निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन दर्शना माळी, तर आभार लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांनी मानले. यावेळी विद्यालयातील शिक्षक, सेवकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



**पनवेल : महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी नगरसेवक परेश ठाकूर यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल भाजप युवा मोर्चा, जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या. महापालिकेतील सहकारी सभापती-नगरसेवक यांनीदेखील त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार उपस्थित होते.**

# एटीएममधील रक्कम लांबवणारा अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

एटीएममधून पैसे काढणाऱ्या ग्राहकांची रक्कम कॅश डिस्पेन्सिंग स्लॉटमध्येच अडकवून ती परस्पर लांबवणाऱ्या चोरट्याला तळोजा पोलिसांनी रंगेहाथ पकडले. अकिब मो. इर्शाद खान असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही कमांड सेंटरमधील अंमलदारांची सतर्कता आणि बीट मार्शलच्या तत्परतेमुळे ही कारवाई शक्य झाली.

तळोजा येथे राहणारा अकिब खान हा एटीएमच्या कॅश डिस्पेन्सिंग स्लॉटमध्ये विशेष प्रकारची पत्र्याची पट्टी अडकवून ग्राहकांची रक्कम बाहेर न पडता स्लॉटमध्येच अडकवण्याची युक्ती वापरत होता. त्यानंतर ग्राहक निघून गेल्यानंतर अडकलेली रक्कम काढून घेत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. तळोजा फेज १ येथील अ‍ॅक्सिस बँकेच्या एटीएममध्ये अकिब हा कॅश डिस्पेन्सिंग स्लॉटमध्ये पत्रा अडकवत असताना त्याची संशयास्पद हालचाल सीसीटीव्ही कमांड सेंटरमधील पोलिसांच्या निदर्शनास आली. कमांड सेंटरमधील अंमलदारांनी तत्काळ गस्तीवरील पोलिसांना माहिती देत संशयिताचा फोटो व व्हिडिओही पाठवला. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने एटीएम केंद्र गाठले.

## संपादकीय

# आंदोलनांची गर्दी

निवडणूक आयोगाने एसआयआरशी संबंधित निर्णय तिन्ही निवडणूक आयुक्तांच्या एकमताने झाल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विरोधकांचे आरोप आणि आयोगाचे अधिकृत स्पष्टीकरण यांच्यातील फरक जनतेने लक्षात घेणे आवश्यक आहे. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार निर्विवाद आहे. मात्र आंदोलनात मांडला गेलेला प्रत्येक आरोप आपोआप वस्तुस्थिती ठरत नाही.

**निवडणूक आयोगाच्या कारभारावरून विरोधकांचे उलटसुलट आरोप सुरूच असून या मुद्यावर महाराष्ट्रातही राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. विशेष म्हणजे आयोगाविरोधात काँग्रेस, कॉक्रोच जनता पार्टी आणि उद्धव ठाकरे–राज ठाकरे यांची स्वतंत्र आंदोलने समोर येत आहेत. काँग्रेसने सोमवारी याच मुद्यावर राज्यभर आंदोलन केले. तर सीजेपीने २ ऑक्टोबरला आंदोलनाची आणि जेल भरोची घोषणा केली आहे. त्यांच्या पाठोपाठ उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ४ ऑक्टोबरला मुंबईत मोर्चा काढण्यात येणार आहे. समान मुद्यावर तीन स्वतंत्र आंदोलने का हा प्रश्न त्यामुळे स्वाभाविकपणे विचारला जातो आहे. काँग्रेसचा मुख्य आक्षेप मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनातील म्हणजेच एसआयआरमधील अनियमितता आणि मतदारयादीतून कथित पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याबाबत आहे. जंतरमंतरवरील जेनझींच्या आंदोलनामुळे प्रकाशझोतात आलेल्या सीजेपीने सर्वांच्या आधी थेट मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याचीच मागणी केली. सीजेपी हा नोंदणीकृत राजकीय पक्ष नाही हे इथे लक्षात घेतले पाहिजे. तरीही विरोधकांच्या राजकीय पक्षांच्या बरोबरीने ते स्वतंत्र आंदोलन उभे करत आहेत. ठाकरे बंधूंनी स्वतःच्या स्वतंत्र मोर्चाची घोषणा करताना सीजेपीच्या आंदोलनालाही पाठिंबा दर्शवला आहे. वास्तविक काँग्रेस आणि सीजेपीच्या आंदोलनांनंतर ठाकरे बंधूंना स्वतंत्र मोर्चाची गरज का भासावी? समान विषयावर विरोधकांची ही वेगवेगळी आंदोलने स्वाभाविकच त्यांच्या एकजुटीबाबत प्रश्न निर्माण करतात. काँग्रेसचे स्वतंत्र आंदोलन, सीजेपीचे स्वतंत्र आंदोलन आणि ठाकरे बंधूंचा स्वतंत्र मोर्चा यातून विरोधकांमध्ये समन्वयापेक्षा आपापल्या राजकीय प्रभावक्षेत्रासाठीची धडपडच अधिक दिसते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सीजेपीसारखा अद्याप राजकीय पक्ष म्हणून अस्तित्वात नसलेला दबावगट प्रमुख विरोधी पक्षांबरोबर नव्हे, तर त्यांच्या आधीच आंदोलनाची घोषणा करतो हे पारंपरिक विरोधी पक्षांकरिता नक्कीच अस्वस्थ करणारे असू शकते. या स्वतंत्र आंदोलनांमागे परस्परांवर मात करण्याचीच रणनीती आहे की काय असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच केलेले विधान महत्त्वाचे ठरते. निवडणूक आयोग आणि एसआयआरविषयी विरोधकांकडून होत असलेल्या आरोपांवर बोलताना फडणवीस यांनी, जेव्हा लोकांना पटवून देता येत नाही, तेव्हा त्यांना संभ्रमात टाकण्याचे धोरण अवलंबले जाते, अशी टीका केली होती. विरोधकांकडून घटनात्मक संस्थांविषयी संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी म्हटले. तीनही निवडणूक आयुक्तांनी एसआयआरसंदर्भातील निर्णय एकमताने घेतल्याचे स्पष्ट केल्यानंतरही आरोप सुरूच राहणे याकडेही फडणवीस यांनी लक्ष वेधले. मुख्यमंत्र्यांनी आंदोलनाच्या अधिकारावर आक्षेप घेतलेला नाही. मात्र आंदोलन ज्या मुद्यांवर केले जात आहे, ते मुद्दे किती खरे आहेत हे तपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. काँग्रेस, सीजेपी आणि ठाकरे बंधू आपापल्या पद्धतीने रस्त्यावर उतरत असताना सरकार मात्र घटनात्मक संस्थांनी दिलेल्या स्पष्टीकरणांकडे आणि वस्तुस्थितीकडे पाहण्याचा आग्रह धरत आहे. राजकारणात आरोप करणे सोपे असते. पण जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी आरोपांपेक्षा पुरावे अधिक महत्त्वाचे असतात.**

# प्लास्टिकमुक्ती : काळाची गरज आणि आपली जबाबदारी





प्लास्टिक हा आजच्या आधुनिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण असंख्य प्लास्टिक वस्तू वापरतो. टूथब्रशपासून ते मोबाईलच्या कव्हरपर्यंत, किराणा सामानाच्या पिशवीपासून ते पाण्याच्या बाटलीपर्यंत सर्वत्र प्लास्टिक आहे. स्वस्त, हलके, टिकाऊ आणि सहज उपलब्ध असल्यामुळे प्लास्टिकने मानवी जीवन सुसह्य केले, यात शंका नाही. मात्र, याच प्लास्टिकच्या अतिवापरामुळे आज पर्यावरणासमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. म्हणूनच प्लास्टिकमुक्ती ही केवळ घोषणा न राहता ती काळाची गरज आणि प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे.

प्लास्टिकचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे ते निसर्गात सहजासहजी नष्ट होत नाही. एका प्लास्टिक पिशवीला नष्ट होण्यासाठी अनेक वर्षे लागतात असा अंदाज आहे. आपण क्षणभर वापरून फेकून दिलेली बाटली, पिशवी किंवा चमचा पुढील अनेक पिढ्यांसाठी पृथ्वीवर ओझे बनून राहतो. वापरलेले प्लास्टिक कचऱ्याच्या ढिगाऱ्यात साचते, नाल्या तुंबवते, नद्या आणि समुद्र प्रदूषित करते.समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आज जागतिक चिंतेची बाब आहे. नद्यांमधून वाहत जाणारे प्लास्टिक शेवटी समुद्राला जाऊन मिळते. मासे, कासवे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकला अन्न समजून गिळतात, त्यामुळे त्यांचा मृत्यू होतो. प्लास्टिकचे सूक्ष्म कण, ज्यांना मायक्रोप्लास्टिक म्हणतात, ते आता पिण्याच्या पाण्यात, मीठात, भाज्यांमध्ये आणि अगदी मानवी रक्तातही आढळून आले आहेत. याचा मानवी आरोग्यावर होणारा दीर्घकालीन परिणाम चिंताजनक आहे.जमिनीवरील परिस्थितीही वेगळी नाही. शेतजमिनीत साचलेले प्लास्टिक मातीची सुपीकता कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास अडथळा निर्माण होतो, त्यामुळे भूजल पातळी खालावते. प्लास्टिक जाळल्याने विषारी वायू हवेत मिसळतात, ज्यामुळे श्वसनाचे विकार वाढतात. जनावरे कचऱ्यातील प्लास्टिक खातात आणि त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येते.

एकंदरीत प्लास्टिक प्रदूषणाचा फटका निसर्ग, प्राणी आणि मानव या सर्वांनाच बसत आहे.प्लास्टिकमुक्ती म्हणजे प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करणे असा गैरसमज अनेकांच्या मनात आहे. प्रत्यक्षात प्लास्टिकमुक्तीचा अर्थ आहे, अनावश्यक आणि एकदा वापरून फेकून देण्याच्या म्हणजेच सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळणे, आवश्यक तिथेच प्लास्टिकचा पुनर्वापर करणे आणि पुनर्चक्रणाला प्रोत्साहन देणे. वैद्यकीय क्षेत्र, संरक्षण, वाहतूक अशा अनेक क्षेत्रांत प्लास्टिकला पर्याय नाही. मात्र, दैनंदिन जीवनात आपण सहजपणे प्लास्टिक टाळू शकतो. प्लास्टिकमुक्तीसाठी सर्वात प्रभावी उपाय म्हणजे चार आर तत्त्वांचा अवलंब करणे. रिफ्यूज म्हणजे नकार देणे, रिड्यूस म्हणजे वापर कमी करणे, रियूज म्हणजे पुनर्वापर करणे आणि रिसायकल म्हणजे पुनर्चक्रण करणे. दुकानात जाताना कापडी पिशवी नेणे, पाण्यासाठी स्टीलची बाटली वापरणे, प्लास्टिक स्ट्रॉऐवजी स्टील किंवा बांबूची स्ट्रॉ वापरणे, जेवणासाठी स्टीलचे डबे वापरणे, अशा छोट्या सवयींमधून मोठा बदल घडू शकतो.घरातूनच प्लास्टिकमुक्तीला सुरुवात करता येते. किराणा सामान आणताना कापडी किंवा तागाच्या पिशव्या वापराव्यात. भाजीसाठीही कापडी पिशवी उत्तम पर्याय आहे. दूध, तेल यांसारख्या वस्तूंसाठी काचेच्या बाटल्या वापरता येतात. स्वयंपाकघरात प्लास्टिक डब्यांऐवजी स्टील किंवा काचेचे डबे वापरावेत.

वाढदिवस, लग्न यांसारख्या समारंभांत प्लास्टिकच्या डिस्पोजेबल ताट–वाट्यांऐवजी पत्रावळी किंवा स्टीलची भांडी वापरावीत. या सवयी केवळ पर्यावरणासाठीच नव्हे, तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहेत.शाळा आणि महाविद्यालये प्लास्टिकमुक्तीच्या चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण केली, तर पुढील पिढी अधिक जबाबदार बनेल. शाळांमध्ये कापडी पिशव्या तयार करण्याचे उपक्रम, प्लास्टिक संकलन मोहीम, निबंध स्पर्धा, पथनाट्ये यांमधून जनजागृती करता येते.

अनेक शाळांनी आपला परिसर प्लास्टिकमुक्त केला आहे, हा आदर्श इतरांनीही घ्यावा. बाजारपेठा आणि व्यापारी वर्गाचे सहकार्यही महत्त्वाचे आहे. ग्राहकांना कापडी पिशव्या सवलतीत उपलब्ध करून देणे, प्लास्टिक पिशवीऐवजी कागदी पाकिटांचा वापर करणे, अशा उपक्रमांतून व्यापारी योगदान देऊ शकतात. आज अनेक ठिकाणी ताग, बांबू, केळीचे धागे, उसाची चिपाडे यांपासून पर्यावरणपूरक वस्तू तयार केल्या जात आहेत. या उद्योगांना प्रोत्साहन मिळाल्यास रोजगारही वाढेल आणि पर्यावरणाचे रक्षणही होईल. प्लास्टिकच्या पुनर्वापर आणि पुनर्चक्रणाकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. ओला आणि सुका कचरा वेगळा करणे ही पहिली पायरी आहे.

स्वच्छ आणि वाळलेले प्लास्टिक पुनर्चक्रणासाठी देता येते. अनेक बचत गट आणि संस्था टाकाऊ प्लास्टिकपासून टिकाऊ वस्तू, फरशा, बेंचेस तयार करत आहेत. प्लास्टिक बाटल्यांपासून टी–शर्ट तयार करण्याचे तंत्रज्ञानही विकसित झाले आहे. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केले, तर कचरा ही समस्या न राहता तो संसाधन बनेल.व्यक्तिगत पातळीवर काही सोप्या सवयी अंगीकारल्या, तर प्लास्टिकमुक्ती सहज शक्य आहे. चहा–कॉफीसाठी स्वतःचा कप बाळगणे, बाहेरचे अन्न मागवताना प्लास्टिक चमचे नाकारणे, शॅम्पूच्या छोट्या बाटल्यांऐवजी मोठी बाटली घेणे, प्लास्टिक खेळण्यांऐवजी लाकडी किंवा मातीची खेळणी निवडणे, या छोट्या कृतींतून मोठा फरक पडतो. सोशल मीडियाच्या माध्यमातून आपण या चांगल्या सवयींचा प्रसारही करू शकतो.प्लास्टिकमुक्ती ही एक दिवसाची मोहीम नाही, तर ती जीवनशैली आहे. ती यशस्वी होण्यासाठी सातत्य आणि सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. घर, शाळा, कार्यालय, बाजारपेठ, प्रत्येक ठिकाणी जाणीवपूर्वक निर्णय घेतले पाहिजेत.

आज आपण वापरलेले प्लास्टिक उद्या आपल्या मुलांच्या भविष्यावर परिणाम करणार आहे याचे भान ठेवले पाहिजे. निसर्गाने आपल्याला भरभरून दिले आहे. स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, हिरवीगार जंगले हे आपले खरे धन आहे. ते जपण्याची जबाबदारी आपलीच आहे. प्लास्टिकचा मोह टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारले, तर आपण येणाऱ्या पिढ्यांना सुंदर आणि निरोगी पृथ्वी देऊ शकू. चला तर मग आजपासूनच एक छोटा संकल्प करूया, मी अनावश्यक प्लास्टिक वापरणार नाही हाच संकल्प प्लास्टिकमुक्तीच्या मोठ्या चळवळीची सुरुवात ठरेल.

**(साभार इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# हॉटेल खोलीतील छुपे कॅमेरे स्मार्टफोनच्या मदतीने शोधा

नव्या नव्या ठिकाणी फिरायला जाणं, हे अनेकांना आवडतं. पण हल्ली सुरक्षिततेबाबत अनेकजण काळजी व्यक्त करतात. अनेक जोडप्यांना हॉटेलमध्ये असलेले छुपे कॅमेरे किंवा महिलांना प्रवासात शौचालयातील छुप्या कॅमेऱ्यांची भीती वाटत असते.



या छुप्या कॅमेऱ्यांमुळे आता पर्यटनातील गोपनीयता धोक्यात आलेली आहे. त्यामुळेच पर्यटक आता अधिक दक्ष असतात. पण आता चिंता करण्याचे कारण नाही. कारण प्रत्येकाकडे असलेला स्मार्टफोन अशा छुप्या कॅमेऱ्यांचा शोध घेण्यास मदतकरूशकतो.

स्मार्टफोनच्या फ्लॅशलाइटचा वापर करा

मोबाइलमधील फ्लॅशलाइटचा वापर विविध पद्धतीने करता येऊ शकतो. रुममध्ये कॅमेरे कितीही लपवून ठेवलेले असले तरी त्यावर प्रकाश पडताच, कॅमेऱ्याचे लेन्सही चकाकते.

हॉटेल रुममधील सर्व दिवे बंद करा स्मार्टफोनचा टॉर्च सुरू करा आणि हवा मोकळी राहण्यासाठी केलेले एअर व्हेंट्स, स्मोक डिटेक्टर, अलार्म घड्याळ आणि आरशांवर टॉर्च मारा.टॉर्च मारल्यानंतर तिथे लहानसा चमकणारा बिंदू किंवा लेन्ससारखा पृष्ठभाग दिसतो का पाहा.

स्मार्टफोनचा कॅमेरा वापरून इन्फ्रारेड लाईट्स शोधा

अनेक छुप्या कॅमेऱ्यांना इन्फ्रारेड लाईट्स असतात. जे मानवी डोळ्यांना दिसत नाहीत. पण स्मार्टफोनचे कॅमेरे हा लाईट सहज शोधू शकतात.हॉटेलच्या रुममधील दिवे बंद करा किंवा त्याचा प्रकाश कमी करा. स्मार्टफोनमधील कॅमेरा सुरू करून व्हिडीओ पर्यायावर जा. स्मार्टफोनचा कॅमेरा हळूहळू संपूर्ण खोलीत हळूहळू पॅन करा. जिथे जिथे कॅमेरा लपवला असण्याची शक्यता आहे, तिथे तुमचा कॅमेरा न्या.तुमच्या कॅमेऱ्याच्या व्हिडीओमध्ये लहान चमकणारे ठिपके दिसत आहेत का पाहा.इन्फ्रारेड लाईट छुपे कॅमरे असल्याची खूण दर्शवितात.

कॅमेरा डिटेक्शन ॲपचा वापर कराआयओएस आणि ॲंड्राईड प्ले स्टोअरवर छुपे कॅमेरे शोधणारे अनेक ॲप्स उपलब्ध आहेत. याचांही वापर करता येईल. हे ॲप्स आपल्या स्मार्टफोनचा कॅमेरा वापरून छुपे कॅमेरे शोधण्यास मदत करतात. या ॲप्सच्या मदतीने इन्फ्रारेड लाईट्स, मॅग्नेटिक फिल्ड्स आणि नको असलेले सिग्नल शोधता येतात. त्यामुळे असे ॲप वापरणे कधीही सोपे आहे.

# पार्श्वगायक शंतनू मुखर्जी ऊर्फ शान

गायक शानने संगीत क्षेत्रात दमदार एन्ट्री केली आणि मुसु मुसु हसी, देउ मला लै या गाण्याने तरुणांना अक्षरशः वेड लावले होते. हे तेव्हाचं गीत आहे जेव्हा लोक मोबाईलपेक्षा आपल्या माणसांना अधिक वेळ देत होते. शानने संगीत क्षेत्रात प्रवेश केला व आपल्या या पहिल्याच गाण्याने लाखो तरुणांच्या मनावर राज्य केले. शानचा जन्म ३० सप्टेंबर १९७२ रोजी मध्य प्रदेशातील खंडवा शहरात झाला. त्याचे पूर्ण नाव शंतनु मुखर्जी असे आहे. त्याचे बालपण वांद्रे येथील बहुसंख्य कॅथोलिक ख्रिश्चन असलेल्या भागात गेले.

तो बंगाली ब्राह्मण कुटुंबातील आहे. त्याचे वडील मानस मुखर्जी हे संगीतकार आणि गायक होते. त्याची आई, सोनाली मुखर्जी या गायिका होत्या. त्यांचे नुकतेच २० जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. शानचे आजोबा जहर मुखर्जी हे गीतकार होते. त्याला सागरिका नावाची एक मोठी बहीण आहे, जी एक गायिका आहे.

शानने वयाच्या पाचव्या वर्षी जिंगल्स गाण्यास सुरुवात केली होती, तेव्हा त्याला इतर मुलांसह माईकसमोर उभे केले गेले. जसजसा तो मोठा होत गेला तसतसा त्याचा आवाज कर्कश होत गेला. त्यामुळे त्याला माईकपासून दूर ठेवण्यात आले आणि शानची घोर निराशा झाली त्यानंतर त्याने पुन्हा कधीही माईक हातातघेणे टाळले होते. तो शान आता अशा काही भारतीय गायकांपैकी एक आहे



## निमित्त


ज्यांनी ब्लू, मायकल लर्न्स टू रॉक, मेल सी आणि समीरा सैद यांसारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांसोबत काम केले आहे.

शानचा इथपर्यंतचा प्रवास खरोखर प्रेरणादायी आहे. शान १४ वर्षांचा होता तेव्हा त्याने त्याचे वडील गमावले, ते तंबाखूच्या सेवनाने मरण पावले होते. वडिलांच्या निधनानंतर आईने गायिका म्हणून काम करायला सुरुवात केली. शानने शालेय शिक्षण वांद्रे येथील जेसुइट शाळेत झाले. त्यांनी गुलाम मुस्तफा खान यांच्याकडून संगीताचे प्रशिक्षण घेतले आहे. शानने गीतकार सुरेश वाडकर यांच्या आजीवासन म्युझिक अकादमीमध्ये संगीताचे धडे घेतले आहे, परंतु त्याची कामगिरी समाधानकारक नसल्याचे लक्षात आल्यानंतर, त्याने परीक्षा देणे टाळले आणि लाजिरवाणेपणामुळे पुन्हा तो वाडकरांच्या क्लासला आला नाही.

शानच्या गाण्यांचे आजही लाखो दिवाने आहेत. शानने आपल्या संगीताने रसिकांना मंत्रमुग्ध करत या इंडस्ट्रीत मोठे यश मिळवले आहे. संगीताचा वारसा लाभलेल्या घरात जन्मलेला असला तरी त्याला या क्षेत्रात येण्यासाठी वाटेत आलेल्या प्रत्येक संघर्षाचा सामना करावा लागला आहे. तरुणपणातच वडिलांचे आकस्मिक जाणे त्यानंतर एकट्या आईवर आलेली कुटुंबाची जबाबदारी अशाही बिकट परिस्थितीतून दिवस काढून शानने हे यश गाठले आहे. शानने त्याच्या संघर्षाच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये, शिकवणीवर्ग घेतले, केबल टीव्ही पॉइंट्स विकले. त्याने डीटीपी सेवा देखील चालवली आहे. जेट एअरवेज, ईस्ट–वेस्ट एअरलाइन्स, इत्यादी क्लायंटसाठी लेआउट आणि प्रिंट मटेरिअल तयार करण्याचे कामदेखील शानने केले आहे.

शानने बंगाली, मराठी, आसामी, कन्नड, तेलुगु, तमिळ, गुजराती, मल्याळम व उर्दू भाषेतही गाणी गायली आहेत. तो एक अभिनेता, टेलिव्हीजन प्रस्तुतकर्ता व होस्ट आहे. सारेगमपा, सारेगमप लिटील चॅम्प्स, स्टार व्हॉईस ऑफ इंडिया आणि स्टार व्हॉईस ऑफ इंडिया २ हे शो होस्ट केले. तो सारेगमप लिटील चॅम्प्स २०१४–१५ व द व्हॉइस इंडिया किड्स २०१६मध्ये जज म्हणून दिसला. शानने २००३मध्ये राधिका मुखर्जीसोबत लग्न केले. या जोडप्याला शुभ व सोहम अशी दोन मुले आहेत. **(साभार इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुमच्या दिवसाची सुरुवात 'या' गोष्टींनी करा...

तुम्हालाही झोपेतून उठताना थकवा आणि आळस जाणवतो? आता तुमच्या कॉफीच्या सेवनाचे परीक्षण करण्याची आणि त्याशिवाय सकाळची सुरुवात करण्याचे मार्ग अवलंबण्याची वेळ आली आहे. आपल्यापैकी बरेच जण कॉफीवर अवलंबून असतात, परंतु कॅफिनच्या अवलंबित्वामुळे शरीरातील ऊर्जा कमी होऊ शकते, झोपेत व्यत्यय येऊ शकतो आणि पचनाच्या समस्यादेखील उद्भवू शकतात, असे क्लिनिकल आहारतज्ज्ञ गरिमा गोयल म्हणाल्या. त्यांनी सकाळी एक कप कॉफी न पिताही ऊर्जावान वाटण्याचे अनेक नैसर्गिक मार्ग आहेत यावर भर दिला.



सकाळच्या थकव्याचे सर्वात दुर्लक्षित कारण म्हणजे डिहायड्रेशन. सहा–आठ तासांच्या झोपेनंतर तुमचे शरीर नैसर्गिकरित्या डिहायड्रेट होते, ज्यामुळे तुम्हाला आळस जाणवतो. पचन आणि चयापचय गतिमान करण्यासाठी एक ग्लास कोमट पाण्यात लिंबू पिळून प्या. इलेक्ट्रोलाइट संतुलन सुधारण्यासाठी पाण्यात चिमूटभर गुलाबी मीठ घाला. सकाळी उठल्यावर सर्वात आधी चहा किंवा कॉफीऐवजी पाणी प्या. योग्यरित्या हायड्रेट केल्याने तुमचे चयापचय सुरू होते, विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे तुम्हाला अधिक जागृत आणि सतर्क वाटते.

शारीरिक हालचाल तुमच्या शरीराला जागे होण्याचा संकेत देते आणि मेंदूमध्ये रक्ताभिसरण आणि ऑक्सिजनचा प्रवाह वाढवून तुम्हाला ऊर्जा देते. झोपेतून उठल्यावर लगेच ५–१० व्यायाम करा. डाउनवर्ड डॉग किंवा कॅट काउ यांसारख्या काही योगासनांमुळे रक्तप्रवाह सुधारतो. एंडोर्फिन वाढवण्यासाठी १०–१५ मिनिटे सकाळी जलद चालणे किंवा हलका कार्डिओ करा. जर तुम्हाला कमी तीव्रतेचे व्यायाम आवडत असतील तर सौम्य व्यायाम किंवा खोल श्वास घेण्याचे व्यायामदेखील मदत करू शकतात. अगदी थोडीशी हालचालदेखील तुम्हाला किती जागृत आणि ताजेतवाने वाटते यावर लक्षणीय परिणाम करू शकते.

सकाळी किमान १०–१५ मिनिटे बाहेर पडा. जर तुमच्या घरात सूर्यप्रकाश कमी येत असेल तर लाईट थेरपी लॅम्प वापरण्याचा विचार करा. सकाळचा सूर्यप्रकाश झोपेच्या आणि जागे होण्याच्या चक्रांचे नियमन करण्यास मदत करतो आणि व्हिटॅमिन–डीचे उत्पादन वाढवतो, जे उर्जेच्या पातळीसाठी महत्त्वपूर्ण आहे.

# कौशल्याधारित शिक्षणातून रोजगाराच्या संधी निर्माण करा -जिल्हाधिकारी किशन जावळे

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत कोकण आणि नाशिक विभागात आयोजित करण्यात आलेल्या 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभा'चा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज करण्यात आला. त्याच अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील रोजगार महाकुंभाचा शुभारंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते अलिबाग येथील जे.एस.एम. महाविद्यालयात करण्यात आला.



युवकांनी केवळ पुस्तकी शिक्षणावर अवलंबून न राहता विविध क्षेत्रांतील कौशल्य आत्मसात करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.सेवा संकल्प अभियान (१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६) अंतर्गत आज कोकण आणि नाशिक विभागात एकाच दिवशी ४०० पेक्षा अधिक ठिकाणी आणि रायगड जिल्ह्यात १२ ठिकाणी रोजगार मेळावे /प्लेसमेंट आयोजित करण्यात आले आहेत.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग आणि जे.एस.एम. महाविद्यालय, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील या रोजगार महाकुंभाचे आयोजन करण्यात आले.एकाच वेळी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या माध्यमातून युवकांना विविध उद्योग, आस्थापना व रोजगारदात्यांशी थेट संवाद साधण्याची आणि उपलब्ध रोजगाराच्या संधी जाणून घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यावेळी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. ॲड. गौतम पाटील, जे.एस.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्य सोनाली पाटील, उपप्राचार्य श्री. गायकवाड, विविध उद्योगांचे प्रतिनिधी, कौशल्य विकासाशी संबंधित अधिकारी-कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने युवा विद्यार्थी व रोजगाराच्या शोधात असलेले उमेदवार उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बदलत्या रोजगाराच्या गरजा लक्षात घेऊन युवकांनी शिक्षणासोबतच कौशल्य विकासावर भर देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी मिळविणे पुरेसे नसून संबंधित क्षेत्रात प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता, तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य, संगणकाचे ज्ञान आणि उद्योगाच्या गरजेनुसार आवश्यक कौशल्ये आत्मसात करणे महत्त्वाचे आहे. युवकांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निश्चित करून त्यामध्ये प्रावीण्य मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

ग्रामीण तसेच शहरी भागात विविध प्रकारच्या कुशल मनुष्यबळाची मोठी गरज आहे. प्लंबिंग, विद्युत काम, वाहन दुरुस्ती, संगणक, तांत्रिक सेवा, क्रीडा तसेच विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाला मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे युवकांनी आपल्या अंगभूत क्षमता आणि सर्जनशीलतेचा उपयोग करून एखाद्या कौशल्यात प्रावीण्य मिळवावे. एखाद्या कामात कौशल्य आणि प्रावीण्य प्राप्त केल्यास त्या व्यक्तीची रोजगारक्षमता वाढण्याबरोबरच समाजातही त्याचे स्वतंत्र स्थान निर्माण होते.

रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून युवक आणि विविध उद्योगांचे प्रतिनिधी यांच्यात थेट संवाद घडवून आणण्यात येत आहे. रोजगाराच्या शोधात असलेल्या उमेदवारांनी उपलब्ध संधींची माहिती घेऊन संबंधित उद्योगांच्या प्रतिनिधींशी संवाद साधावा, आपला बायोडाटा सादर करावा आणि मुलाखतीला आत्मविश्वासाने सामोरे जावे. उमेदवारांनी स्वतःच्या कौशल्यांची प्रभावी मांडणी करून आपल्या क्षमतेनुसार योग्य रोजगाराची संधी मिळविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी केले.

या रोजगार महाकुंभाचा उद्देश युवकांच्या कौशल्याला योग्य रोजगाराची संधी मिळवून देणे तसेच उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हा आहे. युवक, प्रशिक्षण संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असेही ते म्हणाले.यावेळी जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी मेळाव्यामध्ये सहभागी संस्थांच्या विविध स्टॉल्सना भेट देऊन उपलब्ध रोजगार व भरती प्रक्रियेची माहिती घेतली.

## अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वडगाव आदिवासीवाडी परिसरात अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २६ मे ते २६ जून २०२६ रात्री १० वाजेपर्यंतच्या कालावधीत वडगाव आदिवासीवाडी येथे ही घटना घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. आरोपी हा पीडित मुलीच्या बहिणीचा दीर असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.आरोपीने अल्पवयीन पीडित मुलीशी तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याने ती गर्भवती झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**जाहीर सूचना**

कामाचे नाव :- पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वडाळे तलाव येथे पनवेल महानगरपालिका आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम साजरा करणेकरीता प्रायोजकत्वासाठी प्रस्ताव मागविणेबाबत.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये वडाळे तलाव येथे **दिवाळी पहाट २०२६** या कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत आहे. सदर कार्यक्रम साजरा करणेकामी महापालिकेमार्फत प्रायोजकत्वासाठी प्रस्ताव मागविणेत येत आहेत. सदरचे पस्ताव कार्यालयीन वेळेत दिनांक ७ /१०/२०२६ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका मालमत्ता विभागात सादर करावेत.

सदर प्रस्तावांमध्ये कार्यक्रमाची रुपरेषा, अंदाजित सहभागी संख्या, अंदाजित खर्च, इ. बाबींचा समावेश असावा. उत्कृष्ट प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थेस मुख्य प्रायोजकत्व बहाल करण्यात येईल. याबाबत अंतिम निर्णय मा. आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका यांचे राहतील, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.३१४/३३६/ २०२६
दिनांक :- २९/०९/२०२६

**सही/-**
**उपायुक्त (मालमत्ता)**
**पनवेल महानगरपालिका**

## तळा तालुका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका सेवानिवृत्त संघटनेच्या माध्यमातून सत्तर वर्ष पुर्ण झालेल्या सेवानिवृत्त कर्मऱ्यांचा गौरव सोहळा संघटनेचे अध्यक्ष अनंत वारे यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.यावेळी ७०+ असणाऱ्या ३२ कर्मचाऱ्यां सन्मान चिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

यामधे संघटनेचे माजी अध्यक्ष भानू मंचेकर,तसेच मारूती शिर्के, नामदेव भौड,कृष्णा पंदेरे,पद्मा गाडगीळ ,जनार्दन वडके, तुकाराम रातवडकर,हुसेनमिया परदेशी , बाळाराम चव्हाण ,लक्ष्मण मनवल, शांताराम नटे, चंद्रकांत चव्हाण,दयानंद जानराव, बाळू कदम, गोविंद ठाकर, नामदेव किर्तनेआदिंचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले आहे.तसेच वाढदिवस या उपक्रमाअंतर्गत अनंत वारे व नवनियुक्त सदस्या वर्षा दातार यांचाही सत्कार करण्यात आला आहे.

यावेळी सचिव दिपक ठाकूर, तुकाराम बांद्रे, मनोहर चव्हाण, सहदेव सोंडकर, कल्पना गायकवाड,विनया खैरे आदि उपस्थित होते .यावेळी सत्तर प्लस सेवानिवृत्त कर्मचारांचा सत्कार करण्यात आला आहे.हा त्यांच्या आयुष्यातील एक आनंदाचा क्षण असून त्यांच्या आयुष्यातील हे त्यांच्या केलेल्या चांगल्या कामाचा सन्मान आहे.यावेळी भानू मंचेकर म्हटले की आजचा कार्यक्रम हा आमच्या सर्वांच्या आठवणीत राहील असा झाला आहे.आम्हा सर्वाचा सत्कार झाला याचा अभिमान असून आनंद होत आहे.




## अलिबाग गौरा गणपती दर्शन





श्रीबागचा राजा साखरचौथ सार्वजनिक गणेशोत्सव



लाईन बॉईजचा राजा सार्वजनिक साखरचौथ गणेशोत्सव



ठिकरुळ नाका मित्र मंडळ अलिबाग साखरचौथ सार्वजनिक गणेशोत्सव



चेंढरे ग्रामस्थ मंडळ साखरचौथ सार्वजनिक गणेशोत्सव



श्रीगणेश भाजी विक्रेते सामाजिक विकास मंडळ साखरचौथ सार्वजनिक गणेशोत्सव

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे, तहसील पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार सिमा वेंकट अय्यर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे पोंयंजे,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ८/१ | १-३०-९० | ०-१५-२० | १-४६-१० या पैकी विक्रीदार यांच्या मालकीचे क्षेत्र ०-१९-७० | ०.८० |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २९/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९

**PUBLIC NOTICE**

Through this Public Notice, all concerned are hereby informed that our clients have decided to enter into and sale transaction with the existing occupant/holder Mrs. Seema Vyankat Ayyar of the agricultural land described below, situated at Village Poyanje, Taluka Panvel, District Raigad.

The details of the said agricultural land as recorded in the Revenue Records are as follows:

**DESCRIPTION OF THE AGRICULTURAL LAND**

Village Poyanje Taluka Panvel, District Raigad, within the jurisdiction of the Office of the Sub-Registrar, Panvel.

| Gut No. | Hissa No. | Area in R-Sq. Mtr. | Assessment Rs=Ps. |
|---|---|---|---|
| 8 | 1 | 1-46-10 Out of 0.19.70 | 0.80 |

Any person having any mortgage, gift, bequest, lease, tenancy, charge, lien, encumbrance, easement, inheritance right, claim, interest or any other right or title of whatsoever nature in respect of the aforesaid agricultural land/property, is hereby required to intimate the same in writing, along with documentary evidence in support thereof, to the undersigned Advocate within **15 days** from the date of publication of this Notice.

Any such objection/claim shall be addressed to the Advocate of the proposed Purchaser by Registered Post A.D. within the aforesaid period.

If no objection or claim is received within the aforesaid period, it shall be presumed that the said property is free from all encumbrances and claims, and the proposed sale transaction shall be completed with the existing owner/holder of the said property. Any claim or objection raised thereafter shall not be binding upon our clients/purchasers, and the same shall be specifically recorded accordingly.

Place: Panvel
Date: 29/09/2026

Sd/-
Adv. Swapnil V. Jadhav
B.A., LL.B.

Office Address :- Gala No. 154, Municipal Corporation Complex, Near Tahsildar Office, above Datt Xerox, Taluka Panvel, District Raigad - 410206. Contact: 8888271759

## जिल्ह्यातील रेड रिबन क्लबचे नोडल अधिकारी, पीअर एज्युकेटर यांना प्रशिक्षण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आयुक्त (शहरी आरोग्य) तथा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई डॉ.सुनील भोकरे व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार व उपसंचालक (आयईसी) तथा पालक अधिकारी (डापकु रायगड), महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई रोशनी कदम यांच्या नियोजनानुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग संजय माने व जे.एस.एम. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील २४ महाविद्यालयातील रेड रिबन क्लबचे नोडल अधिकारी व पीअर एज्युकेटर यांचे प्रशिक्षण जे.एस.एम. महाविद्यालय अलिबाग येथील सभागृहात संपन्न झाले.



यावेळी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी महाविद्यालयातील नोडल अधिकारी व पीअर एज्युकेटर यांना एचआयव्ही/एड्स विषयी जाणीव, जागृती होण्याकरिता व त्यांना संसर्गापासून सुरक्षित ठेवण्याकरिता रेड रिबन क्लबचा सहभाग कसा महत्वाचा आहे व त्यांचे कार्य कशाप्रकारे करावयाचे आहे हे सांगितले. याशिवाय एचआयव्ही/ एड्स कार्यक्रम कसा राबविला जातो, एचआयव्हीला हद्दपार करण्याकरिता सर्वांचा सहभाग किती महत्वाचा आहे हे विशद केले. जे.एस.एम. महाविद्यालयच्या प्राचार्या सोनाली पाटील, प्रोफेसर प्रवीण गायकवाड, प्रोजेक्ट ऑफिसर अश्विनी आठवले यांनी सुद्धा मार्गदर्शन केले असून एचआयव्ही/एड्स प्रतिबंधामध्ये नोडल अधिकारी व पीअर एज्युकेटर यांची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याबाबत विशद केले. तर रवींद्र कदम, जिल्हा सहाय्यक लेखा यांनी रेड रिबन क्लबमार्फत घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाविषयी व त्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाविषयी व त्यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रोजेक्ट ऑफिसर अश्विनी आठवले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अक्षय बेरड यांनी परिश्रम घेतले.

## 'अल्काइल अमाइन्स'तर्फे महिलांना शिलाई मशीन

**मोहोपाडा ,रसायनी: प्रतिनिधी**

महिलांना कौशल्याच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने ग्रुप ग्रामपंचायत वासांबे (मोहोपाडा) येथील ग्रामपंचायत सभागृहात 'कौशल्य विकासातून आर्थिक स्वावलंबनाकडे' या महिला कौशल्य विकास व आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सभागृहात मंगळवार दि.२९ रोजी करण्यात आले होते .अल्काइल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड यांच्या सामाजिक दायित्व निधी (CSR) अंतर्गत २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रशिक्षणामध्ये वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीतील महिलांना शिवणकलेचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना स्वतःचे कौशल्य विकसित करून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करता याव्यात आणि कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात हातभार लावता यावा, यावर विशेष भर देण्यात आला.



# मुंबई-रेवस जलवाहतूक गुरुवारपासून पूर्ववत

## कोकणातील प्रवाशांची गैरसोय होणार दूर

**उरण : प्रतिनिधी**

मुंबईतील भाऊचा धक्का ते अलिबागच्या रेवसदरम्यान पावसाळ्यात चार महिने बंद करण्यात आलेली प्रवासी वाहतूक सेवा गुरुवार दि. १ ऑक्टोबरपासून पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे. यामुळे कोकणात जाणाऱ्या हजारो प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे. तसेच उरणच्या करंजा ते रेवस जलमार्गावरील ताणही कमी होणार आहे.



दरवर्षी २६ मेपासून भाऊचा धक्का ते रेवस तसेच मोरा ते भाऊचा धक्का, गेट वे ते मांडवा या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक बंद करण्यात येते आणि सप्टेंबर महिन्यापासून पुन्हा सुरू केली जाते. मोरा ते भाऊचा धक्का, गेट वे ते मांडवा यादरम्यानची सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक सप्टेंबरपासून सुरू करण्यात आली, मात्र भाऊचा धक्का ते रेवस मार्गावरील बोटसेवा अद्याप सुरू करण्यात आली नव्हती. सातत्याने बदलणाऱ्या हवामानामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून ही प्रवासी वाहतूक सुरू करण्यात आली नव्हती, अशी माहिती मुंबई जलवाहतूक संस्थेचे सचिव शराफत मुकादम यांनी दिली.

सध्याचे वातावरण सागरी वाहतुकीसाठी अनुकूल झाल्याने चार महिने बंद असलेली प्रवासी बोट वाहतूक १ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात येणार आहे. मुंबई-रेवस सागरी मार्गावरील तिकीट दर १०० रुपये आहे. भाऊचा धक्का येथून १ ऑक्टोबरला सकाळी ६.३० वाजता पहिली बोट सुटेल. त्यानंतर ८, १०, १२, दुपारी ४ व ५ अशा वेळेत बोटी सोडण्यात येतील. वातावरण बदल व खराब हवामानामुळे बोटींच्या वेळापत्रकात बदल केला जाईल, अशी माहिती मुंबई जलवाहतूक संस्थेने दिली.

# एअर इंडियाची आता ऑनलाइन ड्यूटी-फ्री सेवा

## नवी मुंबई विमानतळाचा समावेश

**नवी मुंबई : बातमीदार**



एअर इंडियाने अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडच्या भागीदारीत आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी एकात्मिक ऑनलाइन ड्यूटी-फ्री खरेदी मंच सुरू केला आहे. एअर इंडियाच्या अधिकृत वेबसाइट आणि मोबाइल ॲपमध्ये हा डिजिटल स्टोअरफ्रंट समाकलित करण्यात आला असून निवडक विमानतळांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना विमानतळावर पोहोचण्यापूर्वीच ड्यूटी-फ्री वस्तूंची निवड, प्री-ऑर्डर आणि ऑनलाइन पेमेंट करता येणार आहे.

ऑनलाइन बुक केलेल्या वस्तू प्रवाशांना संबंधित विमानतळावरील नियुक्त ड्यूटी-फ्री काउंटरवरून घेता येतील. या सुविधेमुळे प्रवाशांचा विमानतळावरील खरेदीचा वेळ वाचणार असून प्रवासाचे नियोजन अधिक सुलभपणे करता येणार आहे. नवीन डिजिटल प्लॅटफॉर्मवर सौंदर्यप्रसाधने व सुगंधी द्रव्ये, चॉकलेट व कन्फेक्शनरी, ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स तसेच लक्झरी बेव्हरेजेसचा समावेश असलेला विस्तृत कॅटलॉग उपलब्ध करून देण्यात आला आहे. प्रारंभिक टप्प्यात मानक किरकोळ किमतींवर २५ टक्क्यांपर्यंत विशेष सवलत मिळणार आहे. याशिवाय विविध बँक ऑफर्स आणि हंगामी सवलतींचाही लाभ मिळू शकणार आहे. एअर इंडियाच्या महाराजा क्लब लॉयल्टी कार्यक्रमाच्या सदस्यांसाठीही या सुविधेत विशेष लाभ देण्यात आला आहे. पात्र ड्यूटी-फ्री व्यवहारांमध्ये खर्च केलेल्या प्रत्येक १०० रुपयांमागे ३ महाराजा क्लब रिवॉर्ड पॉइंट्स मिळणार आहेत.

त्यामुळे ड्यूटी-फ्री खरेदीसोबतच लॉयल्टी रिवॉर्ड्स मिळविण्याची संधी प्रवाशांना उपलब्ध होणार आहे. ही ऑनलाइन ड्यूटी-फ्री सेवा सध्या अहमदाबाद, जयपूर, लखनऊ, मंगळुरू, मुंबई, नवी मुंबई आणि तिरुवनंतपुरम या विमानतळांवरून प्रवास करणाऱ्या पात्र प्रवाशांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. एअर इंडिया एक्स्प्रेसद्वारे चालवल्या जाणाऱ्या उड्डाणांसह काही कोडशेअर मार्गांवरील प्रवाशांनाही या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. आगामी काळात देशातील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील आणखी विमानतळांवर ही सेवा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

# तुर्भेत प्रमाणपत्रे, शासकीय योजना शिबिर संपन्न



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे व तहसीलदार कार्यालय नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भाजप नगरसेवक अमित मेढकर यांच्या माध्यमातून विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी हनुमान नगर, तुर्भे नाका येथील जनसंपर्क कार्यालयात प्रमाणपत्रे व विविध शासकीय योजनांचा लाभ शिबिराचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते.

याप्रसंगी अंकुश मेढकर, अमर मेढकर, विष्णू मेढकर, जयराम जांभळे, सम्राट डांगे, शानू ढामळे, सूरज भिडे, सुनील दळवी, संजय मेढकर, अशोक मेढकर, राहुल म्हस्के तसेच ग्राम महसूल अधिकारी संतोष खैरनार, मंडळ अधिकारी मोहन बोंबे, ग्राम महसूल अधिकारी प्रिया पंडित आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरामध्ये आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती, मतदार ओळखपत्र, आयुष्मान भारत कार्ड, जात व उत्पन्न प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती, लाडकी बहीण योजना तसेच वैद्यकीय तपासणी अशा विविध सुविधांचा समावेश होता. प्रभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घेतला.

विमुक्त जाती व भटक्या जमातीतील नागरिकांनी या उपक्रमाला दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद अत्यंत समाधानकारक होता. अनेक शासकीय सेवा एकाच ठिकाणी सहज उपलब्ध झाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद पाहायला मिळाला. शासनाच्या कल्याणकारी योजना समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत पोहचविण्यासाठी असे उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरतात, असे नगरसेवक अमित मेढकर यांनी सांगितले.

# आगरी मंगलाष्टका पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आगरी मंगलाष्टका हे पुस्तक सुप्रसिद्ध वक्ते राजाराम पाटील, ज्येष्ठ साहित्यिक एल. बी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार ३ ऑक्टोबर रोजी बी. टी. रणदिवे ग्रंथालय, आग्रोळी गाव, बेलापूर येथे सायं. ५.३० वाजता प्रकाशित होणार आहे. यानिमित्त आगरी धवला लग्नगीते, सटीची गाणी, आगरी मंगलाष्टके सादर केली जाणार आहेत, असे गजआनन म्हात्रे यांनी सांगितले.

मुंबई, नाशिक, पालघर, ठाणे, रायगड जिल्ह्यांत बोलली जाणारी आगरी बोली लिखित स्वरूपात यावी म्हणून नवी मुंबईचे कवी, लेखक गजआनन म्हात्रे यांनी नाटक, पुस्तक आणि व्याख्यान यांच्या माध्यमातून आगरी बोली जागराचा वसा घेतला आहे.

# तालुकास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत एमएनएम विद्यालयाची शानदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोलीस मुख्यालय, कळंबोली येथे २८ सप्टेंबर रोजी आयोजित तालुकास्तरीय ॲथलेटिक स्पर्धेत एमएनएम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत ८ सुवर्ण, ६ रौप्य आणि ६ कांस्य अशी एकूण २० पदके पटकावली. ४-१०० मीटर रिले स्पर्धेत विद्यालयाच्या विविध वयोगटातील संघांनी चमकदार कामगिरी केली. १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने कांस्यपदक मिळवले.



या संघात स्मित पाटील, रसिक म्हात्रे, आयुष भांबरे आणि सबुज कांतीदास यांचा समावेश होता. १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने रौप्यपदक पटकावले. सई मोकळ, प्रिंजल म्हात्रे, प्रिती गाडगे आणि श्रावणी गाडगे यांनी संघाचे प्रतिनिधित्व केले. १७ वर्षांखालील मुलींच्या रिले संघाने रौप्यपदक, तर मुलांच्या संघाने कांस्यपदक पटकावले. १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने रौप्यपदक, तर मुलींच्या संघाने कांस्यपदक मिळवले. वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्येही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. १४ वर्षांखालील गटात रणवीर कुमार सिंग याने १०० मीटर आणि २०० मीटर धावण्यात दोन सुवर्णपदके पटकावली.

स्नेहित भोईर याने ४०० मीटर धावण्यात कांस्यपदक मिळवले. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात रानू डांगे हिने गोळाफेक आणि हॅमर थ्रोमध्ये दोन सुवर्णपदके मिळवत दुहेरी यश संपादन केले. जीविका पाटील हिने हॅमर थ्रोमध्ये सुवर्णपदक पटकावले. श्रावणी गाडगे हिने ३००० मीटर वॉकिंग रेसमध्ये रौप्यपदक मिळवले. १७ वर्षांखालील मुलांच्या गटात सक्षम ठाकूर याने १०० मीटर धावण्यात रौप्यपदक आणि लांब उडीत कांस्यपदक मिळवले. शिवचरण यादव याने ४०० मीटर धावण्यात रौप्यपदक, तर सूरज कुमार सिंग याने हॅमर थ्रोमध्ये सुवर्णपदक पटकावले. १९ वर्षांखालील मुलींच्या गटात सई मोकळ हिने १०० मीटर धावण्यात सुवर्णपदक मिळवले.

१९ वर्षांखालील मुलांच्या गटात स्मित कल्पेश पाटील याने लांब उडीत सुवर्णपदक, तर श्लोक ठाकूर याने त्रिकूदमध्ये कांस्यपदक पटकावले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे क्रीडा शिक्षक वर्षा नालावडे आणि वामन कुर्हाडे यांचे मोलाचे योगदान लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून सातत्याने सराव करून घेतला. योग्य तंत्राचे प्रशिक्षण दिले तसेच स्पर्धेच्या दृष्टीने आवश्यक मार्गदर्शन केले.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे आणि पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी सर्व विजयी खेळाडू तसेच क्रीडा शिक्षक वर्षा नलावडे आणि वामन कुर्हाडे यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी इक्बाल काझी

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल एज्युकेशन सोसायटीची निवडणूक नुकतीच पार पडली. त्यानंतर संस्थेच्या याकुब बेग हायस्कूल येथील कार्यालयात नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात आली. या सभेत इक्बाल हुसैन काझी यांची सलग चौथ्यांदा सोसायटीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेच्या आजवरच्या वाटचालीत एखाद्या व्यक्तीची सलग चौथ्यांदा अध्यक्षपदी निवड होण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे सांगण्यात आले.

कार्यकारी मंडळाच्या सभेत उपाध्यक्षपदी अब्दुल मुकीत अब्दुल लतीफ काझी यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या घटनेनुसार मोहम्मद नूर हसनमिया पटेल आणि अलीम अमिरुद्दिन पटेल यांची सचिवपदी, तर नवीद अब्दुल कदीर पटेल यांची खजिनदारपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

# केबीपी महाविद्यालयात क्षयरोगावर जागृतीपर व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९व्या जयंतीनिमित्त वाशीतील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात २६ सप्टेंबर रोजी डॉ. अंचित भटनागर यांचे क्षयरोग कारणे, लक्षणे व उपचार पद्धती या विषयावर जागृतीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात महाविद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती सप्ताहांतर्गत केबीपी महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहांतर्गत महाविद्यालयातील आरोग्य व कल्याण समिती आणि विश टू केअर हॉस्पिटल यांच्या सहकार्याने विद्यार्थी व शिक्षकांसाठी क्षयरोगासंदर्भात जागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध छातीविकार तज्ज्ञ व पल्मोनोलॉजिस्ट डॉ. अंचित भटनागर यांनी विद्यार्थ्यांना क्षयरोगाची कारणे, लक्षणे, प्रतिबंध, निदान, उपचार तसेच औषधांना प्रतिकार करणारा टीबी याबाबत अत्यंत सोप्या, सुबोध आणि शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत क्षयरोगाविषयी असलेल्या गैरसमजुती दूर करण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य व कल्याण समितीच्या चेअरमन डॉ. अश्विनी पांडे व त्यांच्या समितीतील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सारडे जि.प. शाळेला संगणकाची भेट

## इनरव्हील क्लबचा स्तुत्य उपक्रम



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, नवनवीन अभ्यासक्रम तसेच शैक्षणिक विषय सोप्या आणि प्रभावी पद्धतीने समजून घेता यावेत, या उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउन यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा सारडे येथे संगणक भेट देण्यात आला.

उपक्रमाचे आयोजन इनरव्हीलच्या अध्यक्ष हेतल खोना, सचिव भारती विक्रमसी, क्लब सदस्य आशिता दावडा व मिनल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. ग्रामीण विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाला इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउनच्या अध्यक्ष हेतल खोना, सचिव भारती विक्रमसी, क्लब सदस्य आशिता दावडा व मिनल शहा, आकाश फाउंडेशन मुंबईच्या सचिव संजीवनी श्रृंगारे, सारडे ग्रामपंचायतीचे सरपंच रोशन पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका समृद्धी व्हाडी, शिक्षिका अपूर्वा घरत, रश्मी पवार, वनिता पाटील, सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, कृषी मित्र प्रकाश माळी, हॉटेल एमडीएसचे मालक नितीन म्हात्रे, साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे जयेश म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनायक म्हात्रे, उपाध्यक्ष उज्ज्वला पाटील, सदस्या पूनम पाटील, कविता म्हात्रे, मंगेश पाटील, मदतनीस ज्योत्स्ना पाटील तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना इन्नरव्हील क्लबच्या अध्यक्ष हेतल खोना म्हणाल्या की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात दर्जेदार शिक्षण घेता यावे आणि आधुनिक माहिती-तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे यासाठी इनरव्हील क्लब सातत्याने प्रयत्नशील आहे.



उरण : विंधणे येथील भाजप नेते प्रसाद पाटील, दिशा पाटील, प्रवीण पाटील यांच्या घरातील गौरा-गणपती.





पनवेल : भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी नरेश पाटील (वाकडी) आणि रमेश पाटील (कोप्रोली) यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी सागर मढवी, धनाजी पाटील, अरुण पाटील, रोशन पाटील आदी उपस्थित होते.



पनवेल : दापोली येथे एकता व दक्षता गणेश मित्र मंडळ तसेच सुयोग स्पोर्ट्स यांच्या गौरा-गणपतीचे माजी सरपंच सुभाषशेठ म्हात्रे यांनी दर्शन घेतले.



शुभांगी बाजी, खांदा कॉलनी से. १०, पनवेल

# रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रात ९६.५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध

**रोहा : प्रतिनिधी**

यावर्षी पाऊस उशिरा झाला असला तरी रायगड जिल्ह्यात चांगला पाऊस पडला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील धरणक्षेत्रात चांगला पाणीसाठा असून रायगड जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रात ९६.५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.



## २८पैकी २० धरणांत १०० टक्के पाणी

रायगड जिल्ह्यातील रायगड पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत २८ धरणापैकी २० धरणे १०० टक्के भरली आहेत. उर्वरित ८ धरणापैकी सर्वात कमी पाणीसाठा श्रीवर्धन तालुक्यातील रानीवली धरणक्षेत्रात ५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.त्यानंतर श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणक्षेत्रात ६३ टक्के, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरणक्षेत्रात ९६ टक्के व उर्वरित महाड तालुक्यातील वरंध धरणक्षेत्रात ९९ टक्के, खैरे धरणक्षेत्रात ९९ टक्के, कर्जत तालुक्यातील साळोख धरणक्षेत्रात ९९ टक्के, अवसरे धरणक्षेत्रात ९९ टक्के पनवेल तालुक्यातील बामणोली धरणक्षेत्रात ९९ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रात पाणीसाठा पहाता मुरुड तालुक्यातील फणसाड धरणक्षेत्रात १०० टक्के, तळा तालुक्यातील वावा धरणक्षेत्रात १०० टक्के, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणक्षेत्रात १०० टक्के, पेण तालुक्यातील आंबेघर धरणक्षेत्रात १०० टक्के, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरणक्षेत्रात ९६ टक्के, सुधागड तालुक्यात कोंडगाव धरणक्षेत्रात १०० टक्के, घोटवडे धरणक्षेत्रात १०० टक्के, ढोकशेत धरणक्षेत्रात १०० टक्के, कवेळे धरणक्षेत्रात १०० टक्के, उन्हेरे धरणक्षेत्रात १०० टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणक्षेत्रात ६३ टक्के, कुडकी धरणक्षेत्रात १०० टक्के, रानीवली धरणक्षेत्रात ५१ टक्के, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणक्षेत्रात १०० टक्के, संदेरी धरणक्षेत्रात १०० टक्के, महाड तालुक्यातील वरंध धरणक्षेत्रात ९९ टक्के, खिंडवाडी धरणक्षेत्रात १०० टक्के, कोथुर्डे धरणक्षेत्रात १०० टक्के, खैरे धरणक्षेत्रात ९९ टक्के, कर्जत तालुक्यातील साळोख धरणक्षेत्रात ९९ टक्के, अवसरे धरणक्षेत्रात ९९ टक्के, खालापुर तालुक्यातील भिलावले धरणक्षेत्रात १०० टक्के, कलोते मोकाशी धरणक्षेत्रात १०० टक्के, डोणवत धरणक्षेत्रात १०० टक्के, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणक्षेत्रात १०० टक्के, बामणोली धरणक्षेत्रात ९९ टक्के, उसरण धरणक्षेत्रात १०० टक्के, उरण तालुका पुनाडे धरणक्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

# बोरघाटात कंटेनर कोसळला, सुदैवाने जीवितहानी टळली



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील खोपोली बायपास (एक्झिट ) येथे तिव्र उतारावर कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटल्याने कंटेनर मार्ग सोडून पुलावरून खाली घसरला. सुदैवाने कंटेनर खोल दरीत कोसळता कोसळता वाचला अन्यथा १०० फुट खोल दरीत पडला असता. कंटेनर चालकाच्या हाताला किरकोळ मार लागला असून उपचारासाठी खोपोली नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनास्थळी बोरघाट पोलीस व सामाजिक कार्यकर्ते दाखल झाले ही घटना सकाळी ९ वा सुमारास घडली. कंटेनर पुणे येथून द्रुतगती महामार्गावरून खोपोली बायपास मार्गे खोपोली तील इंदिरा चौकातून कर्जत कडे जात होता.बोरघाटातील अपघात होण्याची ही सलग तिसरी घटना असून मागील ४ दिवसांत ४ अपघातात ७ वाहनांचे नुकसान होऊन ३ जणांना आपल्या प्राणास मुकावे लागले आहे तर ३ जण जायबंदी झाले आहेत. या घटनांनी महामार्ग बोरघाट पोलीसांचा मृत्यू दर शुन्य झाल्याचा दावा फोल ठरला आहे.

## वाणिज्यसह कला विभागाच्या विद्यार्थ्यांनाही रोजगाराच्या संधी



**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या वतीने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग आणि शेठ जे. एन. पालीवाला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार महाकुंभ' चे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध संधींची माहिती घेऊन आपल्या कौशल्यानुसार क्षेत्र निवडण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला सुधागड एज्युकेशन सोसायटीचे सचिव ग. रा. म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत वारगुडा, संचालक आलाप मेहता, डॉ. लहुपचंग व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना वैकुंठ पाटील म्हणाले की, कॉमर्स शाखेतील विद्यार्थ्यांसाठी कंपनी प्रशासन, मॅनेजमेंटसह विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी यांसारख्या काही ठरावीक क्षेत्रांचीच माहिती विद्यार्थ्यांना असते. मात्र कॉमर्समध्येही अनेक मोठे विभाग असून त्यामध्ये करिअरच्या विविध संधी आहेत.

आर्ट्स शाखेच्या विद्यार्थ्यांनाही विविध क्षेत्रांत चांगले काम करण्याची संधी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक शाखेनुसार उपलब्ध असलेल्या रोजगार व करिअरच्या संधींची योग्य माहिती देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

देशातील प्रत्येक सुशिक्षित युवकाला रोजगार मिळावा, हे उद्दिष्ट असून अशा रोजगार महाकुंभाच्या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होत आहे. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी व कंपन्यांनी उपलब्ध संधींचा योग्य लाभ घ्यावा, असे आवाहनही वैकुंठ पाटील यांनी केले.

# इनरव्हील क्लब ऑफ पेणच्या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

गणरायाच्या आगमनाने घराघरांत दरवळणारा उकडीच्या मोदकांचा सुगंध आणि महिलांच्या पाककलेतील सर्जनशीलतेचा सुरेख मिलाफ पेणमध्ये अनुभवायला मिळाला. महिलांच्या पाककला कौशल्याला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ पेणतर्फे आयोजित करण्यात आलेल्या उकडीचे मोदक स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

परंपरेची चव, कौशल्याचा साज आणि कलात्मकतेची जोड देत स्पर्धक महिलांनी एकापेक्षा एक आकर्षक व सुबक मोदक साकारले. त्यामुळे हा उपक्रम केवळ स्पर्धा न राहता महिलांच्या पाककौशल्याचा सुंदर उत्सव ठरला.



स्पर्धेच्या परीक्षक म्हणून पनवेलच्या प्रसिद्ध पाककला तज्ज्ञ संध्या कल्याणकर यांनी काम पाहिले. मोदक व पुरणपोळी बनविण्यात विशेष प्रावीण्य असलेल्या कल्याणकर यांनी स्पर्धकांना उकडीचे मोदक बनविताना घ्यावयाची काळजी, उकडीची योग्य पद्धत, सारणाची चव आणि मोदकाच्या कलात्मक बांधणीबाबत उपयुक्त टिप्स देत मोलाचे मार्गदर्शन केले. स्पर्धेत सुरेखा बिराजदार यांनी प्रथम क्रमांक, वैशाली मलबारी यांनी द्वितीय क्रमांक, तर मयुरी गोडीवले यांनी तृतीय क्रमांक पटकावला. पूनम पाटील, अर्चना पाटील आणि शीतल खाडे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन त्यांच्या कलागुणांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला नगरसेविका पल्लवी प्रसाद कालेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी स्पर्धक महिलांचे कौतुक करून त्यांच्या पाककला कौशल्याला शुभेच्छा दिल्या. "महिलांच्या पाककला कौशल्याला व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी इनरव्हील क्लबतर्फे अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते," असे क्लबच्या अध्यक्षा संयोगिता टेमघरे यांनी सांगितले.

महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देत त्यांना सन्मानाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ पेणच्या सेवाभावी आणि सृजनशील कार्याचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

सामाजिक बांधिलकीसोबतच महिलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्लबच्या सदस्यांकडून सातत्याने राबविले जाणारे उपक्रम कौतुकास्पद असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमाला रुची महालकर, सोनाली पाटील, सुषमा तेलंगे, नीलिमा पाटील, भावना पगारे, दीपिका शिगवण, प्रियांका राजे, प्रियांकि मुखर्जी आणि आलीना सय्यद यांच्यासह इनरव्हील क्लबच्या सदस्यांची उपस्थिती होती. सर्व सदस्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि काटेकोर नियोजनामुळे कार्यक्रमाला उत्सवी वातावरण प्राप्त झाले.

## 'खोकरी–आगरदांडा येथील रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झुडपांची छाटणी करा'

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड – आगरदांडा ह्या रस्त्यावर खोकरी ते आगर दांडा दरम्यान दुतर्फा झाडांच्या फांद्या व वेली मोठ्या प्रमाणावर रस्तावर आल्या असून अरुंद रस्ता असल्याने दोन मोठी वाहने मार्गस्थ होतांना वाहकांच्या अडचणी वाढल्या आहेत . पावसाने आधीच खचलेला रस्ता आणि दोन वर्षांपासून भराव पट्ट्या न टाकल्या मुळे वाहन चालकांना शिकस्त करावी लागल्याचे चित्र आहे .सार्वजनिक



बांधकाम खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष होत असून शांतता सभेत गणेशोत्सवा पूर्वी या रस्त्यावर भरावपट्टया टाकण्याचे दिलेले आश्वासन ही हवेत विरले आहे .

या रस्त्यावर एस टी तून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना गाडी रस्त्यावरून खाली उतरल्यानंतर झाडांच्या फांदया अनवधानाने खरचटण्याने डोक्याला व डोळ्यांना अपघात संभवतो . तसेच डाव्या बाजुच्या आरशांचे ही नुकसान झाल्याची चालकांकडून तक्रारी वाढत आहेत

या सर्व बाबींचा सार्वजनिक बांधकाम खात्याने विचार करावा आणि तातडीने साईड पट्ट्या भराव्यात आणि दुतर्फा वाढलेल्या वेली व फांद्या तोडून नागरीकांना दिलासा द्यावा अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत आवास आणि नागाव समुद्रकिनाऱ्यांची सफाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सेवा संकल्प अभियान व स्वच्छता ही सेवा या संकल्पनेंतर्गत अलिबाग तालुक्यातील आवास व नागाव समुद्रकिनाऱ्याची साफसफाई ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली. गोळा करण्यात आलेल्या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिका–यांसह विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आणि त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यभरात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या महिनाभराच्या कालावधीत सेवा संकल्प



अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे, जनजागृतीपर कार्यक्रम, स्वच्छता अभियान, विविध योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत अलिबाग तालुक्यातील आवास ग्रामपंचायतीतर्फे समुद्रकिनाऱ्याची साफसफाई करण्यात आली. यावेळी स्वच्छता मोहिमेत विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदविला. यानंतर विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

# अंगारकी चतुर्थीला पालीच्या बल्लाळनगरीत भक्तांचा महासागर





## बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासून रांगा

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रख्यात अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली येथील श्री. बल्लाळेश्वर मंदिरात अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त मंगळवारी दि. (२९)रोजी भाविकांचा अक्षरशः महासागर लोटला. रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशाच्या विविध भागांतून १५ हजारांहून अधिक भाविकांनी बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. पहाटेपासूनच मंदिरात दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण बल्लाळनगरी दुमदुमून गेली होती.

अंगारकी चतुर्थीनिमित्त गणेशभक्तांनी उपवास, पूजा आणि दर्शनासाठी मोठ्या संख्येने पाली गाठली. रायगड जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या पायी दिंड्यांमुळे पालीचे वातावरण भक्तिमय झाले होते. लहान मुले, महिला, तरुण तसेच आबालवृद्ध मोठ्या उत्साहाने दिंड्यांमध्ये सहभागी झाले होते. भाविकांसोबत पर्यटकांचीही मोठी गर्दी झाली होती.

अंगारकी चतुर्थीनिमित्त श्री. बल्लाळेश्वर मंदिर तसेच गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वराच्या मूर्तीला सुंदर वस्त्र व आभूषणांनी सजविण्यात आले होते. मंदिराबाहेर आकर्षक रांगोळ्याही काढण्यात आल्या होत्या. मनमोहक सजावट, भक्तांची गर्दी आणि 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.

अंगारकी चतुर्थीला मोठ्या संख्येने भाविक दाखल झाल्याने पालीतील स्थानिक व्यवसायांनाही चांगली चालना मिळाली. हॉटेल, लॉजिंग–बोर्डिंग, पेढे, पापड, लोणचे, मिरगुंड तसेच विविध प्रकारच्या वस्तूंच्या दुकानांमध्ये दिवसभर गर्दी होती. मंदिर परिसरातील दुकाने आणि हॉटेल्स भाविकांनी गजबजून गेली होती. भाविकांच्या मोठ्या संख्येमुळे स्थानिक बाजारपेठेत चांगली आर्थिक उलाढाल झाली.

भाविकांची मोठी गर्दी असल्याने अनेकजण खासगी वाहने, लक्झरी बस आणि इतर वाहनांनी पालीत दाखल झाले. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर काही काळ वाहतूक कोंडीची स्थिती निर्माण झाली होती. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन प्रशासनाकडून सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेची काळजी घेण्यात आली.

बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. दर्शनासाठी रांगेत उभे राहणाऱ्या भाविकांसाठी रेलिंग व शेडची व्यवस्था करण्यात आली होती. थंड पाणी, स्वच्छतागृहे, सुरक्षारक्षक तसेच वाहनांसाठी देवस्थानच्या दोन भव्य मोफत पार्किंगची सुविधा उपलब्ध होती.


## *आधुनिक श्रावण बाळाची गुडघ्यावरून रायगडवारी; आईच्या प्रकृतीसाठी केलेला नवस फेडला*

**महाड : रामप्रहर वृत्त**

'स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी...' आईच्या प्रेमाची महती सांगणारे हे शब्द आजच्या काळातही एका तरुणाने आपल्या कृतीतून सार्थ ठरविले आहेत. आई गंभीर आजारातून सुखरूप बरी व्हावी, यासाठी किल्ले रायगडावर गुडघ्यावरून चालत येण्याचा नवस केलेल्या २४ वर्षीय संदेश तुकाराम पवार याने रविवारी हा नवस पूर्ण केला. संपूर्ण किल्ला गुडघ्यावरून पार करत त्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजदरबारात तसेच समाधीस्थळी दंडवत घालून आपल्या माऊलीच्या आरोग्यासाठी केलेली प्रतिज्ञा पूर्ण केली.

पोलादपूर तालुक्यातील ढवळे गावचे संदेश पवार गेल्या काही वर्षांपासून आपल्या मोठ्या भाऊ–बहिणीसह आईसोबत कोपरखैरणे येथे वास्तव्यास आहेत. संदेश इलेक्ट्रॉनिक्स कंपनीत खासगी नोकरी करतो. काही दिवसांपूर्वी त्याची आई गंभीर आजारी पडल्याने तिला मुंबईतील सत्यम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यानंतर संदेशने आई बरी झाल्यास रायगडावर गुडघ्यावरून चालत येण्याचा नवस केला होता. दरम्यान, डॉक्टरांनी केलेल्या उपचारांना प्रतिसाद देत आईची प्रकृती सुधारली आणि ती सुखरूप घरी परतली. आई बरी झाल्यानंतर संदेशने आपला नवस पूर्ण करण्याचा निर्णय घेतला.

रविवारी (दि. २७) सकाळी साडेसातच्या



सुमारास त्याने किल्ले रायगड चढण्यास सुरुवात केली. गुडघ्यावरून मार्गक्रमण करत तो सायंकाळी पाचच्या सुमारास गडावर पोहोचला. त्यानंतर राजदरबार आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी जाऊन दंडवत घालत त्याने नवसपूर्ती केली.नवस पूर्ण केल्यानंतर रात्री दहाच्या सुमारास माणगाव येथून एसटीने संदेश कोपरखैरणे येथील आपल्या घरी सुखरूप परतला. त्याला दोन बहिणी आणि एक मोठा भाऊ आहे. वडिलांचे लहानपणीच निधन झाले असून, ढवळे येथील नातेवाईक सध्या गुजरातमध्ये वास्तव्यास असल्याचे त्याने सांगितले.

रायगडावर जाणाऱ्या शेकडो शिवभक्तांनी संदेशच्या मातृप्रेमाची आणि श्रद्धेची दखल घेत त्याला कौतुकाची थाप दिली. त्याच्या आईला दीर्घायुष्य लाभावे, यासाठी शिवभक्तांनी शुभेच्छा दिल्या.आजच्या काळात वृद्ध आई–वडिलांना वृद्धाश्रमाचा आधार देणाऱ्या तरुणांसाठी संदेश पवार याची कृती एक वेगळा आदर्श ठरल्याची भावना शिवभक्तांनी व्यक्त केली. आपल्या आईसाठी त्याने केलेली ही रायगडवारी अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# नीरू धांडाचा 'सुवर्ण'वेध | आशियाई क्रीडा स्पर्धेत रचला इतिहास

**नागोया : वृत्तसंस्था**

जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय नेमबाज नीरू धांडा हिने महिलांच्या वैयक्तिक ट्रॅप प्रकारात भारतासाठी सुवर्णपदक जिंकत इतिहास रचला. यंदाच्या स्पर्धेतील हे भारताचे पाचवे, तर वैयक्तिक प्रकारातील पहिले सुवर्णपदक ठरले. याआधी सांघिक नेमबाजीसह महिला क्रिकेट तसेच पुरुष आणि महिला कबड्डी संघांनी सुवर्णपदकाची कमाई केली होती.



यापूर्वी महिलांच्या ट्रॅप सांघिक प्रकारात भारताला रौप्यपदक मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नीरूने पावसाच्या परिस्थितीतही संयम कायम ठेवला. आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत तिने २६ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. चीनच्या सन युनोंग आणि कुवेतच्या हजर अब्दुलमलिक यांनी प्रत्येकी २१ गुण मिळवत संयुक्तपणे दुसरे स्थान प्राप्त केले, तर कतारच्या रे बासिल हिने १६ गुणांसह चौथे स्थान मिळवले.

२६ वर्षीय नीरू धांडा ही भारतातील आघाडीच्या ट्रॅप नेमबाजांपैकी एक आहे. यापूर्वी तिने आशियाई अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपदही पटकावले होते. आता तिच्या खात्यात आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकाची भर पडली आहे.

नीरूसाठी हे वर्ष विशेष ठरले आहे. जुलैमध्ये इटलीतील लोनेटो येथे झालेल्या आयएसएसएफ विश्वचषकात तिने महिलांच्या ट्रॅप प्रकारात कारकिर्दीतील पहिले सुवर्णपदक जिंकले होते.

**लष्करात नायब सुभेदार**

भारतीय लष्कराच्या मार्क्समनशिप युनिटमध्ये कार्यरत असलेली नीरू नायब सुभेदार आहे. नीरूचा खेळातील प्रवास सोपा नव्हता. सामान्य कुटुंबातून आलेल्या नीरूने आर्थिक अडचणींचा सामना करत नेमबाजीमध्ये आपले स्थान निर्माण केले. मेहनत, सातत्य आणि चांगल्या कामगिरीच्या जोरावर तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

---

# गव्हाण विद्यालयाचे ॲथलेटिक्स स्पर्धेत दमदार यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण-कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी पनवेल तालुकास्तरीय मैदानी (ॲथलेटिक्स) स्पर्धेत आपल्या दमदार कामगिरीची परंपरा कायम राखली. कळंबोली येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत त्यांनी पाच सुवर्ण, नऊ रौप्य आणि सात कांस्य अशी एकूण २१ पदकांची कमाई केली.

स्पर्धेत संतोष दत्ता लोखंडे (अंडर १७) तीन हजार मीटर धावणे, अमित कालीबहादूर डांगर (अंडर १९) तीन हजार मीटर धावणे, चौहान चांदणी नानू (अंडर १४) ६०० मीटर धावणे, पियुष निलेश कडू (अंडर १९) गोळाफेक आणि आर्या मनीष ढगे (अंडर १९) तीन हजार मीटर चालणे या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

रितू कालीबहादूर डांगर तीन हजार मीटर व १५०० मीटर धावणे, म्हात्रे उन्नती साईनाथ १०० व २०० मीटर धावणे, सारा बालाजी केंद्रे ६०० मीटर धावणे, तेजल जयवंत घरत ४०० मीटर धावणे, जीत सतीश म्हात्रे थाळीफेक, आकांक्षा सचिन जाधव गोळाफेक आणि कंसिका गुरूनाथ ठाकूर तीन हजार मीटर चालणे या खेळाडूंनी रौप्यपदक पटकावले.

याशिवाय संतोष दत्ता लोखंडे ८०० मीटर धावणे, अमित कालीबहादूर डांगर १५०० मीटर धावणे, सानवी प्रेमकुमार भोसले गोळाफेक, अस्मि मेघनाथ म्हात्रे तीन हजार मीटर चालणे, अंडर१७ मुलांची ४ बाय १०० मीटर रिले, नारायण रमाशंकर बिंद गोळाफेक आणि रमित टीकाराम भुल थाळीफेक या खेळाडूंनी कांस्यपदक मिळवले. क्रीडा विभाग प्रमुख सुरेश पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्पर्धेची तयारी केली होती.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलास लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी यशस्वी खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले तसेच आगामी जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.



## अफगाणिस्तानच्या लीगमध्ये पाकिस्तानी खेळाडूंना नो-एन्ट्री!

**कराची : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तान प्रीमियर लीग स्पर्धेला २७ डिसेंबरपासून सुरूवात होणार आहे, पण लीग स्पर्धेत पाकिस्तानचे खेळाडू खेळणार नाहीत. पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाने या लीग स्पर्धेत आपल्या खेळाडूंना भाग घेण्यास बंदी घातली आहे.

पाकिस्तानी मीडिया रिपोर्टनुसार पीसीबीने आपल्या खेळाडूंना ही लीग स्पर्धा खेळण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मनाई केली आहे. या स्पर्धेत आपल्या खेळाडूंनी भाग घेऊ नये, अशीच इच्छा पीसीबीची आहे. या निर्णयामागे नेमके काय कारण आहे अद्याप अस्पष्ट आहे, पण राजकीय वादाचे कारण सांगितले जात आहे. काही महिन्यांपासून या दोन्ही देशात कमालीचा वाद आहे, मात्र हेच कारण आहे का याबाबत अस्पष्टता आहे.






# नवी मुंबईत टेबल टेनिस स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनच्या (एएसए) वतीने तसेच ठाणे, मुंबई शहर, रायगड आणि पालघर जिल्हा या टेबल टेनिस संघटनांच्या मान्यतेखाली आयोजित फोर स्टार रँकिंग टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात पार पडली. एएसएच्या क्रीडा संकुलात ही स्पर्धा रंगली.

या स्पर्धेला ठाणे, मुंबई, रायगड आणि पालघर जिल्ह्यांतील खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध वयोगटांतील तब्बल ४३८ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धा एकूण १४ गटांमध्ये घेण्यात आली. यामध्ये १० वर्षांखालील मुला-मुलींच्या प्रोत्साहनपर गटाचाही समावेश करण्यात आला होता.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास यावेळी टेबल टेनिस संघटनेचे यतीन टिपणीस, सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत काकडे, रायगड जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष संजय कडू, मुंबई शहर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे सहसचिव महेंद्र चिपळूणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे एएसएच्या व्यवस्थापकीय समितीचे अध्यक्ष, सचिव, सहसचिव आणि कार्यकारी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.


स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेता, उपविजेता तसेच दोन्ही उपांत्य फेरीतील खेळाडूंना एएसएच्या वतीने चषक, रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

---

## आशियाई क्रीडा स्पर्धा | भारत-श्रीलंका यांच्यात रंगणार सेमीफायनल

**नागोया** : आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तिसऱ्या उपांत्यपूर्व फेरीतील श्रीलंका आणि नेपाळ यांच्यामधील सामना पावसामुळे रद्द झाला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील सर्वोत्तम क्रमवारीच्या जोरावर श्रीलंकेने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. आता उपांत्य फेरीत भारत आणि श्रीलंका आमनेसामने येणार आहेत.

दोन्ही संघातील सामना १ ऑक्टोबर रोजी जपानमधील आयची प्रिफेक्चरल कोरोली स्पोर्ट्स पार्कच्या मैदानात खेळवला जाईल. याआधी भारतीय संघाचा अफगाणिस्तानविरुद्धचा उपांत्यपूर्व फेरीतील सामनाही पावसामुळे रद्द झाला होता. त्यामुळे आंतरराष्ट्रीय टी-२० क्रमवारीतील भारताच्या अव्वल स्थानामुळे टीम इंडियाला उपांत्य फेरीत प्रवेश मिळाला होता.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com